मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २०१ ■ बुधवार, ०१ एप्रिल २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

# बीडमध्ये 'दैनिक युवक आधार'ची संवाद बैठक उत्साहात संपन्न







**दैनिक युवक आधार**

**बीड प्रतिनिधी :** दैनिक युवक आधारच्या बीड जिल्हा प्रतिनिधींची संवाद बैठक जिल्हा प्रतिनिधी मारुती सत्रे यांच्या पुढाकाराने बीड येथील शासकीय विश्रामगृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या बैठकीत दैनिक युवक आधार अधिक गतिमान करण्यासाठी तसेच वृत्तपत्र तळागाळापर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी विविध मुद्द्यांवर सखोल चर्चा करण्यात आली.

बैठकीला दैनिक युवक आधारचे संपादक संतोष शिवदास आमले, सहसंपादक मुकुंद कांबळे, जिल्हा प्रतिनिधी मारुती सत्रे यांच्यासह रामकिसन कातकडे, शिरूर तालुका प्रतिनिधी शरद गिराम, केज तालुका प्रतिनिधी भीमराव गावडे, गेवराई तालुका प्रतिनिधी बळीराम पारेकर, माजलगाव तालुका प्रतिनिधी तसेच पाटोदा तालुका प्रतिनिधी शेख महेशर ताहेर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी संपादक संतोष आमले यांनी पत्रकारांनी सामाजिक भान ठेवून जबाबदारीने कार्य करणे आवश्यक असल्याचे सांगितले. "वृत्तपत्र हे समाजाचे आरसे असते. त्यामुळे सत्य, निष्पक्ष आणि जनतेच्या हिताचे वृत्तांकन करणे ही आपली प्राथमिक जबाबदारी आहे," असे ते म्हणाले. तसेच पत्रकारांना कोणत्याही प्रकारची अडचण आल्यास संपादक मंडळ सदैव त्यांच्या पाठीशी उभे राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, सहसंपादक मुकुंद कांबळे यांनी प्रतिनिधींना मार्गदर्शन करताना संघटनेत एकी टिकवण्याचे महत्त्व अधोरेखित केले. "आपण सर्वांनी एकत्र येऊन, मिळून-मिसळून काम करावे. जिल्ह्यातील सर्व प्रतिनिधींनी एकमेकांशी आदराने वागून समन्वय साधला तरच दैनिक युवक आधार अधिक बळकट होईल," असे त्यांनी सांगितले.

या संवाद बैठकीमुळे प्रतिनिधींमध्ये एकात्मता वाढली असून, दैनिक युवक आधारच्या माध्यमातून समाजहिताचे कार्य अधिक प्रभावीपणे करण्याचा निर्धार सर्वांनी व्यक्त केला.

# कोंकण विकास समितीची आ. रविंद्र चव्हाण यांच्याशी भेट

**दैनिक युवक आधार**

**किशोर गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख डोंबिवली (प्रतिनिधी)** –रविवार दि. २९ मार्च २०२६ रोजी कोंकण विकास समितीच्या पदाधिकाऱ्यांनी डोंबिवलीचे आमदार व भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष श्री. रवींद्र चव्हाण यांची भेट घेत विविध प्रलंबित मागण्यांकडे लक्ष वेधले. ही भेट श्री. सदानंद थरवळ यांच्या माध्यमातून स्थानिक नगरसेवक श्री. अभिजित सदानंद थरवळ यांच्या नव्या कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी झाली.



या भेटीत समितीच्या वतीने रत्नागिरी–दादर पॅसेंजर रेल्वे सेवा पूर्ववत सुरू करावी, कोकण रेल्वेचे भारतीय रेल्वेत विलीनीकरण करावे तसेच कोकण वैधानिक विकास महामंडळाची स्थापना करावी, अशा महत्त्वाच्या मागण्या मांडण्यात आल्या. कोकणातील प्रवाशांना सध्या भेडसावणाऱ्या अडचणींचा उल्लेख करत पॅसेंजर सेवा पुन्हा सुरू करण्याची गरज समितीने अधोरेखित केली.

आमदार रविंद्र चव्हाण यांनी या सर्व मागण्यांची गांभीर्याने दखल घेत सकारात्मक प्रतिसाद दिला. विशेषतः रत्नागिरी–दादर पॅसेंजर संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. तसेच कोकण रेल्वेच्या विलीनीकरणाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून महाराष्ट्र व गोवा या दोन्ही राज्यांकडून परवानगी मिळाल्यामुळे आता अडथळे फारसे उरले नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. गरज भासल्यास महाराष्ट्र व गोवा हद्दीतील मार्ग ताब्यात घेऊन आधुनिकीकरण करण्याचाही पर्याय विचाराधीन असल्याचे त्यांनी नमूद केले.

या प्रसंगी श्री जयवंत शंकर देरेकर, श्री अक्षय मधुकर महापदी, श्री शेखर राजाराम पालांडे, श्री संतोष अनंत भोसले, श्री प्रमोद कासारे, श्री अनंत वामन सावंत, श्री अभिषेक जगन्नाथ सुर्वे, श्री सुनिल दत्तात्रय नलावडे, श्री संतोष गोरखनाथ घाग, श्री विनायक राणे, श्री प्रसन्न कलमस्टे, श्री सुनील मोरे, श्री राहुल पेडणेकर, श्री प्रताप घाणेकर, श्री विनोद येरुणकर, श्री जनार्दन बाबुराव दळवी आणि श्री कमलेश वसंतराव दळवी आदी मान्यवर उपस्थित होते.या भेटीमुळे कोकणातील रेल्वे व विकासाशी संबंधित प्रश्न मार्गी लागण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# साधेपणा, पारदर्शकता आणि जनसंपर्काचा आदर्श नमुना

## खासदार बळवंत वानखडे यांची युवक आधार टीमशी सदिच्छा भेट"

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे / विदर्भ संपादिका** : खासदार बळवंत बसवंत वानखडे यांच्या कार्यालयाला दैनिक युवक आधारच्या टीमने सौजन्य भेट देत संवाद साधला. कोणतेही सरकारी संरक्षण, कोणताही दिखावा किंवा प्रोटोकॉल न बाळगता, सर्वसामान्यांसाठी नेहमी खुलं असलेलं त्यांचं साधं, सरळ कार्यालय पाहून टीम भारावून गेली.




खासदार वानखडे यांच्या ऑफिसमध्ये कोणताही नागरिक आपल्या समस्यांसह कधीही भेट देऊ शकतो आणि खासदार साहेबही त्याच तात्परतेने त्या समस्यांच्या सोडवणुकीसाठी पुढाकार घेतात. सकाळी सात वाजल्यापासून सुरू होणारा त्यांचा जनसंपर्क दरबार त्यांच्या लोकाभिमुख कार्यपद्धतीचा पुरावा ठरतो.

अतिशय सामान्य कुटुंबात जन्मलेल्या आणि ग्रामपंचायत निवडणुकीतून राजकारणाला सुरुवात केलेल्या वानखडे यांनी आजवर एका निवडणुकीतही पराभव पाहिलेला नाही. जनतेत सामान्यांचा खासदार म्हणून त्यांची ओळख अधिक दृढ झाली आहे.

भेटीदरम्यान वानखडे मी त्यांचे बंधुराज श्री नितेश वानखडे यांनी दैनिक युवक आधारच्या टीमचे मनापासून स्वागत केले आणि पेपरच्या कामाबद्दल भरभरून प्रशंसा केली. त्यांच्या साधेपणाचा आणि लोकसंग्रहाचा प्रत्यय टीमला प्रत्यक्ष अनुभवता आला.दैनिक युवक आधारची ही सदिच्छा भेट प्रेरणादायी आणि फलदायी ठरली.

# आदिवासी विद्यार्थिनी अल्का मरसकोल्हेची 'खेलो इंडिया' राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

## पालकमंत्री मा.ना.इंद्रनील नाईक यांच्या कडून शुभेच्छा संदेश

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड गोंदिया जिल्हा प्रतिनिधी :** एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, देवरी अंतर्गत येणाऱ्या शासकीय आश्रमशाळा बीजेपार येथील विद्यार्थिनी कु. अल्का रामदास मरसकोल्हे हिने क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. ८०० मीटर धावणे आणि ४×४०० मीटर रिले स्पर्धेसाठी तिची पहिल्या ट्रायबल 'खेलो इंडिया' राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



या स्पर्धेच्या पात्रता फेऱ्या पालघर व झारखंडमधील रांची येथे पार पडल्या. या दोन्ही फेऱ्यांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत अल्काने मुख्य स्पर्धेपर्यंत मजल मारली आहे. तिच्या या यशामुळे गोंदिया जिल्ह्याचा तसेच महाराष्ट्राचा मान उंचावला आहे.

अल्का हिच्या या यशाबद्दल महाराष्ट्राचे उद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), उच्च व तंत्र शिक्षण, आदिवासी विकास, पर्यटन तसेच मृद व जलसंधारण विभागाचे राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी अभिनंदन केले आहे. त्यांनी शुभेच्छा संदेशात अलकाच्या चिकाटी, मेहनत आणि क्रीडाकौशल्याचे कौतुक करत हे यश केवळ वैयक्तिक नसून संपूर्ण आदिवासी समाजासाठी व राज्यासाठी अभिमानाची बाब असल्याचे नमूद केले आहे.

'एक आश्रमशाळा एक खेळ' या उपक्रमांतर्गत राष्ट्रीय खेळाडूंच्या मार्गदर्शनाखाली बिजेपार आश्रमशाळेत मिळालेले विशेष प्रशिक्षण, संतुलित आहार व पुरेसे क्रीडा साहित्य यामुळे हे यश शक्य झाल्याचे सांगितले जात आहे. या यशामागे प्रकल्प अधिकारी श्री. उमेश काशीद यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा समन्वयक श्री. तुलसीदास बघाडे व मुख्याध्यापक श्री. अशोक इस्कापे यांचे नियोजन व समर्पण महत्त्वाचे ठरले. अल्काने आपल्या या उल्लेखनीय यशाचे श्रेय *आई-वडील* तसेच क्रीडा प्रशिक्षक *श्री. महेंद्र कचलाम* यांना दिले आहे.अल्का मरसकोल्हे हिच्या या यशामुळे संपूर्ण गोंदिया जिल्ह्यात, आदिवासी समाजात तसेच आश्रमशाळेतील शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून तिच्यावर सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# अलिबागचा पांढराकांदा उरण बाजारापेठेत दाखल

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी/प्रदीप पाटील :** उन्हाळी मौसमात सर्वांनाच हवाहवासा वाटणारा पांढरा कांदा उरणच्या बाजार पेठेत दाखल झाला आहे.या कांद्याच्या औषधी गुणधर्मामुळे उन्हाळी मौसमात घराघरांतून तो हमखास दिसून येतो.त्यामुळे या कांद्याला मोठी मागणी आहे. रायगड जिल्ह्यात खरीप हंगामात भातपिकाची मोठ्या प्रमाणात लागवड होत असते, मात्र रब्बी हंगामात सिंचन क्षेत्र वगळताफारशी पिके घेतली जात नाहीत पण गेल्या काही वर्षांत ही परिस्थिती बदलली आहे.भात कापणीनंतर जमिनीतील ओलावा काही महिने टिकून राहतो याचा फायदा घेत शेतकऱ्यांनी आपल्या शेतात पांढऱ्याकांद्याचे पिक घेण्यास सुरुवात केली आहे.शिवाय



या कांद्यासाठी आवश्यक असणारा भरपूर सूर्य प्रकाश.आणि उष्ण-दमट हवामान या मौसमात नैसर्गिकरीत्या मिळत असल्याने पांढऱ्या कांद्याच्या पिकांची लागवडमोठया प्रमाणात होऊ लागली आहे.विशेष करून रायगड जिल्ह्यात अलिबाग,पेण,मुरुड कर्जत खालापूर आणि माणगाव या तालुक्यात तर या कांद्यासाठी या मौसमात पोषक वातावरण असल्याने या या तालुक्यात या कांद्याचे पिक मोठया प्रमाणात घेतले जाते या हंगामी कांद्याला उरण बाजारपेठेत मोठी मागणी व चांगला बाजारभाव मिळत असल्याने हा कांदा मोठया प्रमाणात विक्रीसाठी उरणच्या बाजार पेठेत दाखल झाला आहे.

रायगड जिल्ह्यांतील अलिबागच्या पांढऱ्या कांद्याला केंद्र सरकारच्या पेंटट विभागाने हे भौगोलिक मानांकन दिले असल्याने रूचकर आणि औषधे गुणधर्म असलेल्या या कांद्याची मागणी दिवसेंदिवस वाढली आहे.व दरही चांगला मिळत आहे. औषधी गुणधर्मामुळे नावारूपाला आलेल्या अलिबागचा पांढरा कांदा विक्रीसाठी उरण बाजारात दाखल झाला आहे. या कांद्याला चांगला भाव मिळत आहे. अलीकडे परराज्यातून देखील या कांद्याला मोठया प्रमाणात मागणी असून औषधी गुणधर्म युक्त हा कांदा असल्याने पांढरा कांदा खरेदी करण्यासाठी नागरिकांची गर्दी वाढत आहे दैनंदिन.उरण बाजारपेठेत सीटीझन हायस्कूल रोड, राजपाल नाका,बाजारपेठ,गांधी चौक आदि ठिकाणी पांढऱ्या कांद्याच्या माळी विकावयास आल्या आहेत.

अलिबाग तालुक्यात प्रामुख्याने नेहुली, खंडाळे, कार्ले,,सागाव , मारुतीधुळे , खंडाळा नेवली कारणे ,खाना उसर तळवली या गावांमध्ये पांढऱ्या कांद्याचे पीक मोठया प्रमाणात घेतले जाते. आता तालुक्यात इतरही गावांमध्ये पांढऱ्या कांद्याची लागवड शेतकरी करू लागले आहेत. त्यामुळे पांढरा कांदा लागवडीखालील क्षेत्र 100 हेक्टरवरून 245 हेक्टरपर्यंत वाढले आहे. लहान कांद्याची माळ 100 रुपयांना, तर मोठ्या कांद्याची माळ 280 रुपये दराने विकली जात आहे.सर्वसाधारपणे मे महिन्या पर्यंतया कांद्यांची विक्री होत असते.

# शिवभोजन केंद्राचे आठ महिन्याचे अनुदान रखडले, केंद्र चालकावर उपासमारीची वेळ

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** पनवेल मधील शिवभोजन केंद्रा चालवणाऱ्या केंद्र चालकांवर उपासमारीची वेळ आली आहे. त्यांचे जवळपास आठ महिन्यांचे अनुदान रखडले आहे. पनवेल पुरवठा विभागाकडून बिल पाठवण्यास होत असलेल्या उशिरामुळे अनुदानाला विलंब झाला असल्याचे समोर आले आहे. पनवेलच्या शहरी भागात 10 आणि ग्रामीण भागात नऊ अशी शिवभोजनची 19 केंद्र आहेत. दररोज 2 हजार 350 मंजूर थाळी असून रोज अंदाजे 2 हजार 200 पेक्षा जास्त थाळीचे वाटप केले जाते. सद्यस्थिती 10 रुपयांमध्ये शिवभोजन थाळी मिळत असून पनवेल परिसरातील हजारो गोरगरीब, नागरिक या थाळीचा लाभ घेत आहेत. या दहा रुपयांमध्ये चपाती, भाजी, भात, वरण मिळते. मात्र आठ महिन्यांपासून शासनाकडून अनुदान प्राप्त झाले नसल्याने पनवेल मधील केंद्र चालकांना हे केंद्र चालवताना तारेवरची कसरत करावी लागते. जुलै 25 ते फेब्रुवारी 26 या 8 महिन्याची केंद्र चालकांनी आपापली बिले दिली. मात्र पुरवठा विभागाकडून जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे बिले वेळेवर पाठवण्यात आले नसल्याने त्याचा फटका केंद्र चालकांना बसत आहे. एक-दोन महिन्यात अनुदान मिळेल या आशेवर आठ महिने गेले तरी देखील अनुदान मिळालेले नाही. पुरवठा विभागाच्या निष्क्रियतेमुळे अनुदान थकले असल्याचा आरोप केंद्र चालकांनी केला आहे.याबाबत पुरवठा अधिकारी, पनवेल यांना विचारले असता केंद्र चालक वेळेवर बिले आणत नाहीत. सात ते आठ जण वेळेवर आणतात आणि जानेवारीपर्यंतची बिले पुढे पाठवली असल्याचे सांगितले.

# दर्यापूर कृषी उत्पन्न बाजार समितीची वार्षिक आमसभा उत्साहात

## आमदार गजाननभाऊ लवटे यांचा विकासकामांवर भर

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्सना करवाडे/ विदर्भ संपादिका** : दर्यापूर कृषी उत्पन्न बाजार समिती भवन येथे वार्षिक आमसभेचे आयोजन मोठ्या उत्साहात पार पडले. या सभेला आमदार श्री. गजाननभाऊ लवटे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. सभेच्या सुरुवातीला गेल्या वर्षाचा अहवाल सादर करण्यात आला.




उपस्थितांना संबोधित करताना आमदार लवटे म्हणाले की, "अनेक शासकीय आणि स्थानिक योजनांच्या माध्यमातून सर्वसामान्यांचे प्रश्न प्राधान्याने सोडवण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत. आगामी काळात कोणत्याही विकासकामासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही. नागरिकांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत," असे आश्वस्त करत त्यांनी विकासाला गती देण्याचा संकल्प व्यक्त केला.

यावेळी बाजार समितीतील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा आमदार लवटे यांच्या हस्ते सत्कार करून गौरव करण्यात आला. समितीच्या कार्याचा आढावा घेत सकारात्मक कामगिरीचे त्यांनी विशेष कौतुक केले.सभेला विविध विभागांचे अधिकारी, मान्यवर, बाजार समितीचे सदस्य तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. विकासाभिमुख घोषणा आणि पारदर्शक कामकाजाचा संदेश देत सभा यशस्वीरीत्या संपन्न झाली.

# सम्राट अशोक जयंती महोत्सवात बौद्ध तत्त्वज्ञानाच्या अंमलबजावणीचा सामूहिक संकल्प

## 'दी स्कूल ऑफ नोबल थॉट' व 'चारिका बुद्ध विहार' येथे भव्य आयोजन

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : दी स्कूल ऑफ नोबल थॉट आणि चारिका बुद्ध विहार, शिल्पा सोसायटी, नरेंद्रनगर (विस्तार) येथे दिनांक २६ मार्च २०२६ रोजी सम्राट अशोकाची भव्य जयंती अत्यंत उत्साहात आणि सांस्कृतिक तेजात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाला बहुजन समाजासह सर्वधर्मीय नागरिकांची मोठी उपस्थिती लाभली.



कार्यक्रमाचे विशेष अतिथी म्हणून आयु. देविदास राऊत (बौद्धाचार्य व उद्योजक, नागपूर) यांची तर अध्यक्ष म्हणून आयु. व्हि. एस. शेंडे आणि प्रमुख वक्ते म्हणून आयु. धम्मपाल देशभ्रतार यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात संयोजक डॉ. एन. व्ही. ढोके यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी बुद्ध धम्माच्या सांस्कृतिक धरोहराच्या बळकटीसाठी सम्राट अशोकाच्या 'बुद्धिस्ट इंडिया'च्या संकल्पनेला आजच्या काळात अधिक महत्व आहे, असे ठाम मत व्यक्त केले.

विशेष अतिथी देविदास राऊत यांनी आपल्या ओजस्वी शब्दांत सांगितले की सम्राट अशोकाच्या नीतिमान प्रशासनामुळे भारत जगातील श्रेष्ठ राष्ट्र बनला होता. आजच्या परिवर्तनशील युगात देशातील प्रत्येक नागरिकाने बुद्ध तत्त्वज्ञान आपल्या दैनंदिन जीवनात आणणे हीच काळाची खरी गरज आहे, असे आवाहन त्यांनी केले.

प्रमुख वक्ते व ख्यातनाम इतिहासकार आयु. धम्मपाल देशभ्रतार यांनी सम्राट अशोकाचा जिवंत इतिहास उलगडत सांगितले की –

"सम्राट अशोक हा बुद्धाच्या शाक्य वंशातील महान चक्रवर्ती सम्राट होता. बहुजन समाज हा अशोकाच्या वंशाची सांस्कृतिक परंपरा जपणारा समाज आहे. त्यामुळे या परंपरेतून प्रेरणा घेऊन पुढील वाटचाल करावी."

आपल्या अध्यक्षीय भाषणात इतिहासकार आयु. व्हि. एस. शेंडे यांनी एका पाश्चिमात्य इतिहासकाराचा दाखला देत सांगितले की –

"ब्रिटिश काळापूर्वी भारत जितका प्रगत होता, त्यापेक्षा कित्येक पटीने हा देश सम्राट अशोकाच्या काळात विकसित होता आणि त्यामागे अशोकाचे उत्कृष्ट प्रशासनच प्रमुख कारण होते."कार्यक्रमाचे सुंदर सुबोध संचालन आयु. बापू खोब्रागडे यांनी केले तर प्रभावी आभारप्रदर्शन आयु. प्रकाश गजभिये यांनी व्यक्त केले. सर्वधर्मीय बांधवांच्या उपस्थितीत कार्यक्रम अधिक उत्साहपूर्ण झाला. शेवटी सुरुची स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# रिसोड मालेगावचे युवा आ. "अमित झनक यांच्या नेतृत्वाखाली ऐतिहासिक विजय"

**दैनिक युवक आधार**
**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत आमदार अमित झनक यांच्या प्रभावी नेतृत्वाखाली त्यांच्या मातोश्री श्रीमती शोभाताई सुभाषराव झनक यांनी ऐतिहासिक विजय संपादन करत सहकार क्षेत्रात झनक परिवाराचा दबदबा पुन्हा एकदा सिद्ध केला आहे. या निकालाने संपूर्ण मतदारसंघात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

या निवडणुकीत एकूण ७४ मतांपैकी तब्बल ५९ मते मिळवत शोभाताई झनक यांनी प्रतिस्पर्धी उमेदवार डॉ. विठ्ठल पाचरने यांचा मोठ्या फरकाने पराभव केला. पाचरने



यांना केवळ १३ मते मिळाली, तर २ मते बाद ठरली. या निकालातून मतदारांनी झनक परिवारावर दाखवलेला विश्वास स्पष्टपणे दिसून आला.

गेल्या अनेक वर्षांपासून झनक परिवाराने सहकार क्षेत्रात सातत्याने काम करत शेतकरी, सर्वसामान्य नागरिक आणि सहकारी संस्थांना बळ देण्याचे कार्य केले आहे. माजी आमदार स्व. रामभाऊ झनक यांच्या कार्याची परंपरा पुढे नेत आमदार अमित झनक यांनी विकासाभिमुख व लोकाभिमुख राजकारणाला प्राधान्य दिले आहे. गावोगावी जाऊन लोकांच्या समस्या समजून घेणे, त्या सोडवण्यासाठी प्रयत्न करणे आणि कार्यकर्त्यांना सोबत घेऊन विकास साधणे—या त्यांच्या कार्यपद्धतीमुळेच मतदारांनी पुन्हा एकदा ठाम पाठिंबा दिला आहे.

जिल्हा बँकेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था सक्षम करण्यासाठी आमदार अमित झनक यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. सहकार क्षेत्रातील त्यांचा अनुभव आणि लोकांशी असलेले नाते यामुळेच या निवडणुकीत अनेक गावांमधून स्वयंस्फूर्तीने पाठिंबा मिळाला.

निवडणुकीदरम्यान विरोधकांनी विविध प्रयत्न करूनही मतदारांना आपल्याकडे वळवण्यात अपयश आले. उलट, विकासकामे आणि विश्वासाच्या बळावर झनक परिवाराने एकतर्फी विजय मिळवत आपली ताकद दाखवून दिली. हा विजय केवळ निवडणुकीपुरता मर्यादित नसून जनतेच्या विश्वासाचा आणि सहकार क्षेत्रातील सातत्यपूर्ण कार्याचा सन्मान मानला जात आहे.या ऐतिहासिक विजयानंतर रिसोड तालुक्यासह परिसरात जल्लोषाचे वातावरण असून कार्यकर्त्यांनी फटाके फोडून, मिठाई वाटून आनंद साजरा केला.सहकार, विकास आणि विश्वास या त्रिसूत्रीवर उभा असलेला हा विजय भविष्यातील वाटचालीसाठी दिशादर्शक ठरणार असून झनक परिवाराच्या नेतृत्वाखाली सहकार क्षेत्रात नवे आदर्श निर्माण होतील, असा विश्वास व्यक्त होत आहे.

# श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रिसोडच्या येथे एन .सी .सी .कॅडेटस् च्या वतीने भगवान महावीर यांना आदरांजली ...!!

**दैनिक युवक आधार**
**रिसोड प्रतिनिधी. रणजीत ठाकूर** : आज दि. ३१/०३/२०२६ रोजी जैन धर्माचे २४वे तीर्थंकर भगवान महावीर यांच्या जयंतीनिमित्त स्थानिक श्री शिवाजी विद्यालय व क महा रिसोड शाळेतील एन.सी.सी.कॅडेटस् च्या वतीने एन.सी.सी.चे सी.टी.ओ.प्रा. अभिजीत देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली भगवान महावीर यांना आदरांजली अर्पण करण्यात आली.




कार्यक्रमाच्या सुरवातीला शाळेचे प्राचार्य मा. संजाबराव देशमुख, उपप्राचार्य मा संजयराव नरवाडे, माजी उपप्राचार्य मा. सुशीलकुमार सोईतकर जेष्ठ शिक्षिका सौ. शोभा राऊत मॅडम यांच्या हस्ते भगवान महावीर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या वेळी प्राचार्य संजाबराव देशमुख यांनी भगवान महावीर यांच्या जीवनावर प्रकाश टाकून महावीरांनी दिलेली जीवनमूल्ये आपल्या वैयक्तिक जीवनात आत्मसात करून जीवन सार्थकी लावावे असे आव्हान केले. तसेच जेष्ठ शिक्षिका सौ शोभा राऊत मॅडम यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

ज्यानंतर शाळेतील एन.सी. सी. चे सी.टीओ. प्रा. अभिजित देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील एन.सी.सी. कॅडेटस् नी परेड द्वारे भगवान महावीर यांना आदरांजली अर्पण केली. या कार्यक्रमास शाळेतील सर्व प्राध्यापक,शिक्षक,शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री डिगांबर पाचरणे यांनी केले.

# वाशिम शहरात पाणी संकट; नळातून पिवळसर पाणी, नागरिकांची चिंता वाढली

**दैनिक युवक आधार**
**वाशिम, (प्रतिनिधी):** वाशिम शहरातील पाणीपुरवठा सध्या गंभीर संकटात आहे. जुनी आययुडीपी कॉलनीसह शहरातील अनेक भागांमध्ये नळातून पिवळसर आणि गाळयुक्त पाणी येत असल्याचे नागरिकांनी नोंदवले. गेल्या काही दिवसांपासून ही समस्या अधिक तीव्र झाली असून नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

नळाद्वारे येणारे दूषित पाणी वापरणे धोकादायक ठरत असून अनेकांनी पर्यायी उपाय शोधले आहेत. मात्र दररोज शुद्ध पाणी खरेदी करणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नसल्यामुळे नागरिकांना गंभीर अडचणींना सामोरे जावे लागत आहे. वैद्यकीय तज्ज्ञांचे म्हणणे आहे की अशा पाण्यामुळे पोटाचे विकार, त्वचारोग, अतिसार, उलट्या यांसारख्या आजारांचा धोका वाढतो. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आजारी व्यक्ती यांचा धोका जास्त आहे. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाण्याची मागणी वाढत असल्यामुळे ही समस्या अधिक चिंताजनक ठरली आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की नगर परिषद प्रशासनाकडून ठोस पावले उचलली जात नाहीत. 'पिण्याचे पाणी स्वच्छ मिळावे, हीच आमची अपेक्षा आहे,' असे अनेकांनी व्यक्त केले.



**पाणीपुरवठा लाईनमधील गळती आणि जुन्या पाइपलाइनची दुरवस्था**

जलशुद्धीकरण प्रक्रियेत त्रुटी तातडीने उपाय म्हणून: दूषित पाणीपुरवठा थांबवून स्वच्छ पाणी उपलब्ध करणे जलशुद्धीकरण प्रकल्पांची नियमित तपासणी व देखभाल, पाईपलाईनमधील गळती व तांत्रिक बिघाड दुरुस्त करणेपाण्याच्या गुणवत्तेची नियमित चाचणी आणि अहवाल सार्वजनिक करणे, शहरातील नागरिकांच्या आरोग्यासाठी आणि मूलभूत सुविधा सुनिश्चित करण्यासाठी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करणे अत्यंत आवश्यक आहे.

# कामठी कॅन्टोन्मेंटसंदर्भात संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांची भेट

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू /संपादक नागपूर विभाग** : जिल्ह्यातील कामठी कॅन्टोन्मेंट क्षेत्रातील विविध नागरिक समस्यांबाबत तसेच या भागाचा येरखेडा नगर पंचायतमध्ये समावेश करण्याच्या मागणीसंदर्भात संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची र महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज दिल्ली येथे भेट घेतली.या भेटीदरम्यान कामठी कॅन्टोन्मेंट परिसरातील नागरिकांना भेडसावणाऱ्या



मूलभूत अडचणींचा चर्चा चर्चा झाली. पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, आरोग्य सुविधा यांसारख्या मूलभूत गरजांबाबत तातडीने उपाययोजना करण्याची गरज अधोरेखित करण्यात आली.तसेच, प्रशासनिक सुलभता आणि नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी कामठी कॅन्टोन्मेंट क्षेत्राचा येरखेडा नगर पंचायतमध्ये समावेश करण्याच्या प्रस्तावावरही सकारात्मक चर्चा झाली. यामुळे स्थानिक नागरिकांच्या दैनंदिन अडचणी कमी होऊन विकासकामांना गती मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी या संबंधित विषयांवर आवश्यक त्या पातळीवर सकारात्मक विचार केला जाईल, असे आश्वासन दिल्याची माहिती देण्यात आली.

# महाअंनिसचे जागृती अभियान वेगात – गोंदिया जिल्ह्यातील ३३ आदिवासी आश्रमशाळांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाची ठसठशीत रोपण!"

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्सना करवाडे/ विदर्भ संपादिका** : महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी प्रकल्प आयुक्तालयाच्या विशेष आदेशानुसार महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (महाअंनिस) नागपूर तर्फे गोंदिया जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर वैज्ञानिक दृष्टिकोन जागृती अभियान राबविण्यात आले. देवरी प्रकल्पातील आदिवासी बहुल अशा एकूण ३३ आश्रमशाळांना भेट देत विद्यार्थ्यांमध्ये अंधश्रद्धाविरोधी विचारांची भक्कम पेरणी करण्यात आली.

हे संपूर्ण अभियान राज्य कार्यकारिणी सदस्य रामभाऊ डोंगरे यांच्या नेतृत्वाखाली पार पडले. मजितपूरपासून कोकणा (जमी),




माकडधोकडा, बोरगाव, किशोरी, सालेकसा, शेरेपार, कडीकसा, पालंदुर, एरंडी, बुधेवाडा अशा अनेक गावांतील आश्रमशाळांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत कार्यक्रम यशस्वी केला.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांना—

वैज्ञानिक दृष्टिकोनाची गरज

जादूटोणा व बुवाबाजीचे धोकादायक परिणाम

जादूटोणाविरोधी कायद्याची माहिती

चमत्कारामागील विज्ञान

या विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

रामभाऊ डोंगरे यांनी विविध चमत्कारांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून त्यांच्या मागील वैज्ञानिक कारणांची उकल केली. तर जिल्हा पदाधिकारी नरेश महाजन, मनोज बनसोड आणि विजय सुरवाडे यांनी प्रभावी गीतांद्वारे आणि सादरीकरणातून मुलांच्या मनात अंधश्रद्धेविरोधात जागरूकता निर्माण केली.

प्रत्येक आश्रमशाळेतील मुख्याध्यापकांच्या अध्यक्षतेखाली शिक्षक–शिक्षिकांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. विद्यार्थ्यांचा उत्साह उल्लेखनीय होता.या संपूर्ण अभियानाचे विशेष आकर्षण ठरला महाअंनिसचा साताऱ्यातून आलेला जादूटोणाविरोधी संदेशांनी सजलेला रथ, ज्यावर बुवाबाजीविरोधी चित्रफिती, घोषवाक्ये आणि वैज्ञानिक माहितीचे चित्रीकरण केले आहे. या रथातून प्रवास करत महाअंनिसची टीम आश्रमशाळांना भेट देत आहे.

गोंदिया जिल्ह्यातील या अनोख्या अभियानामुळे आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक विचार, तथ्यनिष्ठ दृष्टी आणि अंधश्रद्धाविरोधी सक्षम जनजागृतीची सुरुवात झाली असल्याचे मत शिक्षकांनी व्यक्त केले. महाअंनिसचे हे अभियान राज्यभर आदर्श निर्माण करणारे ठरणार, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# हनुमान जन्मोत्सवानिमित्त मानेगाव/ सडक येथे भव्य रक्तदान शिबिर

**दैनिक युवक आधार**
**रोशन खोब्रागडे/ लाखनी तालूका प्रतिनिधी** : उन्हाळ्याच्या दिवसांत भासणारी रक्ताची टंचाई लक्षात घेऊन सामाजिक बांधिलकी जपत, मानेगाव/ सडक येथे यावर्षीही श्री हनुमान जन्मोत्सवानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हा उपक्रम गुरुवार, दि. २ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजल्यापासून श्री भगवान बाबा हनुमान मंदिर, मानेगाव/ सडक येथे पार पडणार आहे. श्री भगवान बाबा देवस्थान समिती तसेच युवा मित्र मंडळ, मानेगाव/सडक यांच्या संयुक्त विद्यमाने या स्तुत्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. उन्हाळ्याच्या काळात अनेक रुग्णालयांमध्ये रक्ताची कमतरता भासते. या पार्श्वभूमीवर गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे, या उदात्त हेतूने स्थानिक तरुणांनी पुढाकार घेतला आहे.हनुमान जन्मोत्सव केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक कार्याद्वारे साजरा करण्याचा निर्धार आयोजकांनी व्यक्त केला आहे.

या शिबिरात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयाच्या ‘ई-गव्हर्नन्स’ची राज्यात छाप

राज्याचे द्रष्टे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राज्यात १०० दिवसांचा ई-गव्हर्नन्स कृती कार्यक्रम यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर शासकीय कामकाजात पारदर्शकता आणि डिजिटल सुविधांचा वापर वाढविण्यासाठी १५० दिवसांचा ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमही राज्यात यशस्वीपणे राबविण्यात आला. जिल्हा व विभागीय स्तरावरील विविध कार्यालये व मंत्रालयीन विभाग स्तरावर राबविण्यात आलेल्या या कार्यक्रमामध्ये सर्वोत्कृष्ट कार्यालयांची सात निकषांवर निवड करण्यात आली. यात विभागीय आयुक्त गटात नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयाने सर्वोत्तम कामगिरी करत राज्यात पहिला क्रमांक पटकाविला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नुकतेच विभागीय आयुक्त कार्यालयाचा सन्मान करण्यात आला. ई- गव्हर्नन्स सुधारणा संदर्भात विभागीय आयुक्त कार्यालयाने केलेल्या वैशिष्ट्यपूर्ण कार्यावर प्रकाश टाकणारा हा लेख.

विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांच्या सक्षम नेतृत्वात विभागीय आयुक्त कार्यालयाने वापरकर्ता पूरक संकेतस्थळ निर्माण करून आवश्यक ते सर्व निकष पूर्ण केले व त्याची रीतसर अंमलबजावणी केली. जनतेला राज्य शासनाच्या अधिसूचित सेवांचा लाभ १ कोटींच्यावर लाभ दिला. नागरीकांच्या तक्रारींचे काल मर्यादित निराकरण केले. ई-ऑफिसद्वारे फाईल व निपटारा प्रक्रिया यशस्वीपणे राबविण्यासाठी अधिकाऱ्यांचे प्रशिक्षणही घेण्यात आले. केंद्र व राज्य शासनाच्या योजना व कार्यक्रमांच्या माहितीसाठी दृश्य डॅश बोर्ड तयार करण्यात आले. याद्वारे विभागातील कार्यक्षमता निरीक्षणही करण्यात आले. व्हाट्सअपस्नेही चॅट बॉट तयार करण्यात आला. वापरासाठी सुलभ असलेल्या या माध्यमाद्वारे तक्रार निवारण पोर्टल, सीएम व्हाट्सअप चॅनल, धरणे-तलावांच्या पाण्याची पातळी आदी माहिती देण्यात आली. विशेष करून आपत्ती काळात जनतेला सतर्कतेची माहिती देण्यात आली.

‘ए आय’ आणि ‘ब्लॉक चेन’ या आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून भारतातील पहिले ‘स्मार्ट व इंटेलिजंट गाव सातनवरी’ हा प्रकल्प प्रत्यक्षात आला. इतरांसाठी प्रेरक ठरलेला हा प्रकल्प आता राज्यातील ७५ गावांमध्ये रविण्यात येत आहे. राज्यातील पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी जीआयएसचा वापर करून वर्धा जिल्ह्यात ‘इंफ्रा युनिक आयडी’ तयार करण्यात आली. हा प्रकल्पही उल्लेखनीय ठरला असून राज्यात याची अंमलबजावणी सुरू आहे.

**संकेतस्थळ निकषात उत्तम कामगिरी**

राज्यातील विभागीय आयुक्त कार्यालयाचे संकेतस्थळ व त्यासाठी घालून दिलेल्या निकषांची उत्तम अंमलबजावणी नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयाने केली आहे. या अंतर्गत कार्यालयाच्या https://divcomnagpur.maharashtra.gov.in/ संकेतस्थळावर पृष्ठ लोड होण्याची गती २.४ सेकंद झाली आहे त्यामुळेच ते वापरकर्ते स्नेही झाले आहे. शासनाच्या अन्य विभागांची माहिती सहजी उपलब्ध करून देत डोमेन अनुपालन चोखपणे करण्यात आले आहे. देशातील सर्व राजभाषांमध्ये या संकेतस्थळाचा मजकूर उपलब्ध करून देण्यात आला आहे. हे संकेतस्थळ सामान्य जनतेला मोबाईल उपकरण आणि वेब ब्राऊझर वर उपलब्ध करून देण्यात आल्याने वापरकर्त्यांना सहज वापरता येते. संकेतस्थळाला भेट देणाऱ्यांची संख्याही दृष्य स्वरूपात दिसते.

हे संकेतस्थळ दिव्यांग वापकर्त्यांसाठी सुलभ करण्यात आले आहे. या संकेतस्थळाच्या मालकीचा उल्लेख दर्शवताना सायबर सुरक्षेची काळजी घेण्यात आली आहे. यासंदर्भात सायबर सुरक्षा ऑडिट प्रमाणपत्रही प्राप्त झाले आहे. संकेतस्थळावरील माहिती वेळोवेळी अद्यावत करण्यात येते तसेच सर्व पुनरुत्पादित कागदपत्रे स्त्रोतांचा उल्लेख करण्यात येतो. यामध्ये दस्तऐवजांचे शीर्षक, मालक संस्था आणि प्रकाशन तारीख यांचा समावेश आहे. नागरिकांची सनद, माहितीचा अधिकार, नवीन घडामोडी व घोषणांचा समावेश आहे. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे नागपूर विभागीय संचालक कार्यालय, नागपूर जिल्हा माहिती कार्यालय आणि नागपूर महानगर पालिकेच्या समाज माध्यमांवरील अद्यावत माहिती या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**आपले सरकारच्या माध्यमातून जनतेला विविध सेवा**

राज्य शासनाकडून अधिसूचित करण्यात आलेल्या २० सेवांचा लाभ विभागातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांच्या मार्फत जनतेला देण्यात आला. १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी निहित कालावधीमध्ये २० कोटी ३ लाख ४७ हजार सेवा जनतेला पुरविण्यात आल्या.



सेवा प्रदानतेचा दर ९८.३२ टक्के आहे. यापैकी २१ लाख ९७ हजार ५४८ लोकांनी माहितीच्या अधिकार सेवेचा लाभ घेतला. यातील १ हजार ७८० प्रकरणे पहिल्या अपिलासाठी आले तर २१८ दुसऱ्या अपिलात प्राप्त झाले. शासनाच्या अधिसूचित सेवा ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आल्या. या सर्व सेवा आपले सरकार पोर्टल सोबत जोडण्यात आल्या.नागरिकांच्या तक्रारींचे विहित कालमर्यादेत निराकरण करण्यासाठी अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण घेण्यात आले.

**ई-ऑफिसचा प्रभावी उपयोग**

विभागीय आयुक्त कार्यालयातील १६४ वापरकर्ते हे ई-ऑफिसचा अवलंब करतात. यातील १५४ वापरकर्ते हे सक्रियपणे ई-ऑफिसचा वापर करतात. १५० दिवसांच्या मोहीम काळात ई-ऑफिसद्वारे फाईलींची प्रक्रिया गतीने करून निपटारा करण्याचा दर ९३.३९ टक्के राहिला. नेहमीच्या पाच टप्प्यांवर फाईल निकाली काढण्याचा दर कमी होऊन तीन टप्प्यांवर आला. ई-ऑफिसच्या हाताळणीसाठी तांत्रिक सहाय्यकाची नेमणूक करण्यात आली. ई-ऑफिसच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अधिकाऱ्यांचे प्रशिक्षणही घेण्यात आले.

**डॅशबोर्डद्वारे माहितीचे अद्यतन व अचूकता**

नागपूर विभागाने विभागीय आयुक्तांच्या ‘केआरए’ मधील कार्यक्षमता निरीक्षणासाठी नवीन डॅशबोर्ड तयार केला आहे. या डॅशबोर्डची मांडणी व्हिज्युअलायझेशन कस्टम, माहितीची छाननी आणि विभाग निहाय परस्पर संवादी इंटरफेस, माहितीचे अद्यतन आणि अचूकता, भूमिका निहाय प्रवेश नियंत्रण, राज्य व केंद्र शासनाच्या महत्त्वाच्या योजना व कार्यक्रमांचा यात समावेश करण्यात आला आहे. डॅशबोर्डचा उपयोग महसुली अधिकाऱ्यांद्वारे थेट बैठकांमध्ये माहितीच्या विश्लेषणासाठी होऊ लागला आहे. हे डॅशबोर्ड मोबाईल, वेब ब्राऊजरच्या माध्यमातून सर्वांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे. डॅशबोर्डच्या हाताळणी व वापरासाठी अधिकाऱ्यांचे प्रशिक्षणही घेण्यात आले.

**व्हाट्सअप चॅटबॉटद्वारे सर्वसामान्यांना मोबाईलवर अधिकृत माहिती**

नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयाने ९३७०४३४६६२ या क्रमांकावर व्हाट्सअप चॅटबॉट जनतेला उपलब्ध करून दिला आहे. आयओएस, अँड्रॉइड आणि वेब प्लेटफॉर्मवर चॅटबॉट उपलब्ध करून देण्यात आला असून नागपूर विभागातील सर्व जिल्ह्यांची माहिती, जिल्ह्यांसंबंधित सेवा येथे उपलब्ध करून देण्यात आल्या.पावसाची आकडेवारी, हवामान सूचना, धरण व तलावाची पातळी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विषयक माहिती, आपत्कालीन हेल्पलाइन क्रमांक उपलब्ध करून देण्यासह जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषदा तसेच पंचायत समिती कार्यालयांच्या अखत्यारितयेणाऱ्या विविध लोकसेवांचा लाभ याद्वारे देण्यात येतो. सीएम व्हाट्सॲप चॅनल, आपले सरकार पोर्टल, तक्रार निवारण पोर्टल हा चॅटबॉट सोबतही जोडण्यात आला आहे. येथे हेल्पलाईन क्रमांक देण्यात आले असून अभिप्राय प्रणालीचाही यात समावेश आहे.

**‘ए आय’ व ‘ब्लॉकचेन’च्या वापराद्वारे राज्यासमोर निर्माण केले मॉडेल**

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ब्लॉकचेन या आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग करून नागपूर ग्रामीण मधील सातनवरी हे गाव देशातील पहिले स्मार्ट इंटेलिजंट गाव ठरले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात आणि विभागीय आयुक्त कार्यालयाच्या नेतृत्वात हा प्रकल्प प्रायोगिक तत्वावर राबविण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २४ ऑगस्ट २०२५ रोजी या प्रकल्पाचे उद्घाटन केले. मुख्य सचिवांनी या प्रकल्पास भेट देऊन वेळोवेळी आढावा घेतला. या प्रकल्पांतर्गत गावात स्मार्ट आरोग्य, पशुसंवर्धन, ड्रोन नियंत्रित खते व कीटकनाशक फवारणी, सीसीटीव्ही सर्वेलन्स, डिजीटल शिक्षण, महिला व बालकल्याण विभागाच्या ऑनलाईन सेवा, रस्त्यावरील स्मार्ट दिवे इत्यादी सेवा पुरविण्यात आल्या.

स्मार्ट शेतीमुळे २५ ते ४० टक्के पाण्याची बचत होते. खतांच्या किमतीस ३० टक्यांनी कपात होत. उत्पादनात २५ टक्केपर्यंत वाढ होते. ड्रोन द्वारे फवारणीमुळे कीटकनाशकांचा वापर ५० टक्यांपर्यंत कमी होतो. स्मार्ट स्ट्रिट लायटिंगमुळे ऊर्जेचा वापर ५० ते ७० टक्के कमी होऊन देखभाल खर्चही कमी होतो. या प्रकल्पाची दखल घेत स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करून राज्यातील अन्य पाच विभागांमधील ७५ गावांमध्ये हा प्रकल्प राबविण्यात येत आहे तर नागपूर जिल्ह्यातील १० गावांचा यात समावेश आहे. प्रकल्पाचा भांडवली खर्च राज्य शासनामार्फत उपलब्ध करून देण्यात येणार असून सीएसआर तसेच योग्य संस्थांचे प्रायोजकत्व घेण्याची मुभा या प्रकल्पासाठी देण्यात आली आहे.

**जीआयएसच्या माध्यमातून वर्धा जिल्ह्यात युनिक आयडी**

सातनवरीच्या स्मार्ट इंटेलिजन्स व्हिलेज ची अंमलबजावणी राज्यभर होत असतानाच नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयाच्या नेतृत्वात वर्धा जिल्ह्याने तयार केलेल्या जीआयएस आधारित युनिक आयडी ची संकल्पना राज्यभर राबविण्यात येत आहे. नागरी मालमत्तेसाठी इन्फ्रा युनिक आयडी तयार करण्यासाठी समर्पित भूस्थानिक प्लॅटफॉर्म विकसित करण्यात आला. याद्वारे संपत्ती व मालमत्तेची योग्य नोंद घेण्यात आली. या पद्धतीद्वारे स्थानिक आणि वैशिष्ट्यात्मक डेटा उपलब्ध झाला. त्यातून मिळालेली माहिती गुणवत्ता पूर्ण व अचूक ठरली आणि या माहितीच्या वापराद्वारे विकास कार्यांच्या नियोजनात सुधारणा करण्यात आली. या माहितीच्या आधारे निर्णय घेणे, नियोजन करणे, निधी वाटप, निधीचा वापर, मालमत्तेचा मागावा घेणे, मालमत्तेची स्थिती, योजनेचा वापर, क्षेत्रनिहाय मालमत्तेचे उपलब्धता नवीन मालमत्तेचा प्रस्तावधी आदींमध्ये या पद्धतीचा उपयोग झाला. वर्धा जिल्हासह नागपूर विभागातील अनेक जिल्ह्यांमध्ये या प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण घेण्यात आले.

राज्यभरात सात निकषाधारे ७ मे २०२५ ते १० जानेवारी २०२६ दरम्यान एकूण सहा विभागीय आयुक्त कार्यालयांमध्ये ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम राबविण्यात आला. विभागीय आयुक्त कार्यालयांच्या कामगिरीचे मुल्यमापन कॉलिटी कॉन्सिल ऑफ इंडिया कडून १२७ निकषांवर करण्यात आले.या स्पर्धेत नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयाने २०० पैकी १५९.५२ गुण मिळवून राज्यात प्रथम स्थान पटकाविले.

२८ एप्रिल २०२६ रोजी मुंबईत एका शानदार समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. विभागीय आयुक्तांच्यावतीने महसूल अपर आयुक्त राजेश खवले यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी या यशाबद्दल समाधान व्यक्त करत सांगितले की, “हा पुरस्कार संपूर्ण नागपूर विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या एकत्रित प्रयत्नांचा परिणाम आहे. ई-गव्हर्नन्सच्या माध्यमातून प्रशासन अधिक सुलभ, पारदर्शक आणि परिणामकारक करण्याचा आमचा सातत्याने प्रयत्न राहील. भविष्यातही अधिकाधिक तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना जलद, सुलभ आणि दर्जेदार सेवा पुरविण्यावर भर दिला जाईल.”आयुक्तालयाने मिळविलेला हा पुरस्कार केवळ नागपूर विभागापुरता मर्यादित नसून संपूर्ण राज्यातील प्रशासनासाठी निश्चितच प्रेरणादायी ठरेल.

**रितेश मोतीरामजी भुयार**
**माहिती अधिकारी, माहिती व जनंसर्क, नागपूर**

# लेक्स फेअर २०२६: विविधतेत एकतेचा उत्सव ओरिएंटल कॉलेज ऑफ लॉ  दिमाखात संपन्न”

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी  रणिता ठाकूर /उरण रायगड** : नवी मुंबई सानपाडा : ओरिएंटल एज्युकेशन सोसायटीच्या ओरिएंटल कॉलेज ऑफ लॉ, सानपाडा येथे आयोजित “लेक्स फेअर २०२५-२६” हा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा ३० मार्च २०२६ रोजी वाशी येथील मराठी साहित्य सभागृहात उत्साह, रंगत आणि सांस्कृतिक वैभवाच्या वातावरणात दिमाखात पार पडला. विद्यार्थी, प्राध्यापक, मान्यवर आणि पालक यांच्या उपस्थितीने सभागृह भरून गेले होते.

पारंपरिक दीपप्रज्वलन आणि मंगलमय गणेश वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रमुख पाहुण्या माजी जिल्हा न्यायाधीश मा. नंदा देवी घाडगे मॅडम यांच्या उपस्थितीने सोहळ्याला विशेष प्रतिष्ठा लाभली. आपल्या प्रभावी मार्गदर्शनात त्यांनी “कायद्याचा अभ्यास इंग्रजीत झाला तरी,




न्यायालयीन व्यवहारात मराठी भाषेचे ज्ञान अत्यावश्यक आहे,” असा मोलाचा संदेश देत विद्यार्थ्यांना वास्तवाची जाणीव करून दिली.

जॉन, सुधांशु आणि शिद्रा या विद्यार्थ्यांनी सूत्रसंचालनाची धुरा सांभाळत कार्यक्रमात ऊर्जा आणि आकर्षणाची रंगत भरली. “विविधतेत एकता” या संकल्पनेवर आधारित सादरीकरणांनी भारतीय संस्कृतीतील रंग, परंपरा आणि ऐक्य यांचे मनोहारी चित्र उभे केले.

सांस्कृतिक कार्यक्रमांत नृत्य, नाट्य, गायन आणि फॅशन शो यांची बहारदार मेजवानी पाहायला मिळाली. विशेषतः मयुरी साबळे यांच्या नेतृत्वाखालील “नवदुर्गा” नाट्यप्रयोगाने प्रथम क्रमांक पटकावत प्रेक्षकांची मने जिंकली, तर दिशा म्हात्रे आणि श्रेया पाडळे यांच्या फॅशन शो टीम्सना द्वितीय क्रमांकाचा मान मिळाला.

याचबरोबर २०२५-२६” DLLE उपक्रम, ग्रंथालय समिती, रँकधारक आणि “सर्वोत्तम विद्यार्थी” अशा विविध क्षेत्रांतील गुणवंतांचा सन्मान करण्यात आला. या गौरवाने विद्यार्थ्यांच्या परिश्रमाला योग्य दाद मिळाली.प्राचार्य डॉ. गोर्धन देवनानी, उपप्राचार्य डॉ. युथिका सावंत आणि प्राध्यापकवर्ग यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालय कटिबद्ध असल्याचे नमूद केले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन आणि शिस्तबद्ध आयोजन केल्याबद्दल सांस्कृतिक विभाग आणि स्वयंसेवकांचेही विशेष अभिनंदन करण्यात आले.

समारोपाला सर्व विद्यार्थ्यांच्या सामूहिक नृत्याने सभागृहात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले. टाळ्यांच्या कडकडाटात आणि आठवणींच्या गाठी बांधत “लेक्स फेअर २०२५-२६” हा सोहळा प्रत्येकाच्या मनात कायमस्वरूपी कोरला गेला.

# जागतिक क्षयरोग दिनानिमित्त सीएमई सत्र संपन्न

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल :** जागतिक क्षयरोग दिनाच्या निमित्ताने मेडिकव्हर हॉस्पिटल, खारघर येथे क्षयरोग (टीबी) विषयक कंटिन्यूइंग मेडिकल एज्युकेशन (सीएमई) सत्र संपन्न झाले. या सत्राचे आयोजन HLFPPT व SSHAKTI प्रकल्पांतर्गत मेडिकव्हर हॉस्पिटल आणि नॅशनल ट्यूबरक्युलोसिस एलिमिनेशन प्रोग्राम (NTEP) यांच्या सहकार्याने, जिल्हा क्षयरोग केंद्र रायगड यांच्या समन्वयाने करण्यात आले होते.या कार्यक्रमास सिटी टीबी ऑफिसर, पनवेल डॉ. उषा नाईक व जिल्हा टीबी अधिकारी, रायगड डॉ.प्राची नेहुलकर यांचे मार्गदर्शन लाभले. सत्रात सुमारे ३५ डॉक्टर व रुग्णालयातील कर्मचारी सहभागी झाले होते. यावेळी डॉ.ज्योती सालवी (WHO सल्लागार, NTEP) यांनी ‘NTEP मार्गदर्शक तत्त्वे, औषध-प्रतिरोधक क्षयरोग (DR-TB) आणि क्षयरोग प्रतिबंधक उपचार (TPT)’ या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच ‘NTEP अंतर्गत खासगी क्षेत्रासाठी क्षयरोग सेवा’ या विषयावर विकास कुरणे (रीजनल कोऑर्डिनेटर, HLFPPT) यांनी माहिती देत खासगी डॉक्टरांची भूमिका, निक्षय (Ni-kshay) प्लॅटफॉर्मचा वापर व वेळेत निदान-उपचाराचे महत्त्व अधोरेखित केले. याशिवाय सतीश (PPM कोऑर्डिनेटर, रायगड) यांनी ‘निक्षय मित्र’ उपक्रमाची माहिती देत रुग्णांना पोषण व सामाजिक आधार देण्यासाठी या योजनेचे महत्त्व स्पष्ट केले.

# सार्वजनिक गणेशोत्सव समितीच्या कार्यालय व मीटर रूमचा लोकार्पण सोहळा आ. सुनील राऊत यांच्या हस्ते संपन्न

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** विक्रोळीतील कन्नमवार नगरातील सार्वजनिक गणेशोत्सव समितीच्या विक्रोळीचा विकारहर्ताच्या कार्यालय व मीटर रूमचा लोकार्पण सोहळा विक्रोळीचे आमदार सुनील राऊत यांच्या हस्ते करण्यात आला.याप्रसंगी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नगरसेविका सुनिता चंद्रशेखर जाधव, नगरसेवक दिपक सावंत, महिला विभाग संघटिका व माजी नगरसेविका रश्मी




पहुडकर,उपविभाग प्रमुख चंद्रशेखर जाधव, विक्रोळी ब्लॉक काँग्रेस चे अध्यक्ष राहुल वाघधरे,उपविभाग संघटिका वंदना बेंद्रे,अखिल सार्वजनिक गणेशोत्सव महासंघाचे सचिव सुरेश सरनोबत, शिवराम मळगांवकर,शाखाप्रमुख अभय राणे,शाखा संघटिका आसावरी भोईटे,प्रिया गावडे,माजी महिला संघटिका अहिल्या थोरवे,लिना सुर्यवंशी,मंडळाचे अध्यक्ष समीर आचरेकर, सचिव अजय दळवी आदींसह महिला शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या प्रसंगी मान्यवरांची मार्गदर्शन पर भाषणे झाली.यावेळी हासत नाचत खेळुया,मानाची पैठणी जिंकूया मान वहिनीचा,खेळ पैठणीचा हा महिलांचा रंगतदार कार्यक्रम संपन्न झाला.या कार्यक्रमात शाखा संघटिका आसावरी भोईटे यांच्यासह चार जणी पैठणीच्या विजेत्या ठरल्या.त्यांना भांड्याचा सेट सुध्दा देण्यात आला.त्याचे वितरण रश्मी पहुडकर व वंदना बेंद्रे यांच्या हस्ते करण्यात आले कार्यक्रमास महिलांची उपस्थिती मोठ्या प्रमाणावर होती.

# लोकसहभागातून शिक्षणाची भरारी: मोहदरी जिल्हा परिषद शाळेत अद्ययावत संगणक लॅबचे उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड तालुका प्रतिनिधी / राजू गायकवाड** : बदलत्या काळाची पावले ओळखून ग्रामीण भागातील मुलेही तंत्रज्ञानात मागे राहू नयेत, या उद्देशाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मोहदरी येथे ग्रामस्थांच्या पुढाकाराने आणि शिक्षकांच्या चोख नियोजनाने उभारण्यात आलेल्या 'संगणक लॅब'चे मोठ्या उत्साहात उद्घाटन करण्यात आले.ग्रामीण भागातील शाळेत लोकसहभागातून उभी राहिलेली ही लॅब शाळेतील विद्यार्थ्यांसाठी डिजिटल क्रांतीचे केंद्र ठरणार आहे. याला लोकशक्ती आणि शिक्षक समन्वयाचा आदर्श असेही म्हणता येईल या उपक्रमाचे खास वैशिष्ट्य म्हणजे ही लॅब केवळ सरकारी निधीवर



अवलंबून न राहता, गावकऱ्यांनी स्वेच्छेने जमा केलेल्या लोकवर्गणीतून साकारली आहे. शाळेतील शिक्षकांनी ग्रामस्थांशी संवाद साधून संगणक साक्षरतेचे महत्त्व पटवून दिले. या आवाहनाला प्रतिसाद देत तरुणांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी आर्थिक मदतीचा हात दिला.

उद्घाटन समारंभाला गावातील प्रतिष्ठित नागरिक, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षक उपस्थित होते. रिबन कापून लॅबचे लोकार्पण केल्यानंतर विद्यार्थ्यांनी संगणकावर प्रत्यक्ष काम करून उपस्थितांची मने जिंकली.

> **"आमच्या गावातील मुले आता केवळ पुस्तकी ज्ञान घेणार नाहीत, तर जगाशी जोडली जातील. गावकरी आणि शिक्षक एकत्र आले तर काय होऊ शकते, याचे हे उत्तम उदाहरण आहे."**
>
> **दादाराव चिरंगे**
> **मुख्याध्यापक जिल्हा परिषद शाळा, मोहदरी.**

# 'आउटलेट मॉल ऑफ इंडिया' १५०+ ग्लोबल ब्रँड्ससह महाराष्ट्रातील डिस्काउंट शॉपिंगला नवी दिशा देण्यासाठी सज्ज

**दैनिक युवक आधार**

**मुंबई प्रतिनिधी :** भूमी वर्ल्ड महाराष्ट्रातील पहिला डेडिकेटेड आउटलेट-मॉल, 'आउटलेट मॉल ऑफ इंडिया' सुरु करण्यासाठी सज्ज आहे. हा मॉल महाराष्ट्राच्या रिटेल क्षेत्रातील उत्क्रांतीचा एक महत्त्वाचा टप्पा ठरेल. यामुळे आता भिवंडीची ओळख केवळ एका औद्योगिक केंद्रापुरती मर्यादित न राहता, मुंबई महानगर प्रदेशातील एक वेगाने विकसित होणारे रिटेल, मनोरंजन आणि जीवनशैलीचे ठिकाण म्हणून भिवंडी नावारूपास येत असल्याचा हा एक महत्त्वपूर्ण संकेत आहे.

अत्याधुनिक 'रिटेलटेनमेंट हब' (खरेदी आणि मनोरंजनाचे ठिकाण) म्हणून डिझाइन केलेल्या या मॉलमध्ये, १५० हून अधिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय ब्रँड्सना असणार आहेत. 'ऑलवेज ऑन डिस्काउंट' (Always On Discount) या स्वरूपात वर्षभर सवलती उपलब्ध असतील, ज्यामुळे ग्राहकांना प्रीमियम फॅशन आणि लाइफस्टाइल उत्पादने आकर्षक किमतीत खरेदी करण्याचा आनंद मिळवता येईल. अरमानी एक्सचेंज, सुपरड्राय, लॅकोस्टे, लिवाइज, एसिक्स, कॅल्विन क्लाइन, टॉमी हिलफिगर, जॅक अँड जोन्स, वेरो मोडा यासारखे आघाडीच्या ब्रँड्स या मॉलमध्ये दाखल होत आहेत. उंची ब्रँड्सचे कपडे, पादत्राणे आणि ॲक्सेसरीज अशा विविध श्रेणीतील उत्पादनांची मनोसोक्त खरेदी याठिकाणी करता येईल.

'आउटलेट मॉल ऑफ इंडिया'ची संकल्पना केवळ खरेदीपुरती मर्यादित नाही. अतिशय आनंद व समाधान देणारे, कायम लक्षात राहतील असे अनुभव देणारे ठिकाण म्हणून याची ख्याती निर्माण व्हावी हा यामागचा उद्देश आहे. याठिकाणी जास्तीत जास्त लोकांनी यावे आणि विविध उपक्रमांमध्ये सहभागी होऊन मनोरंजनाचा आनंद घ्यावा यासाठी मनोरंजनाला केंद्रस्थानी ठेवले आहे. या मॉलमध्ये तब्बल २,५०० आसनक्षमता असलेले भव्य 'ओपन-एअर ॲम्फीथिएटर' (खुले नाट्यगृह) आहे, इथे वर्षभर लाइव्ह कॉन्सर्ट्स, स्टँड-अप कॉमेडी, ब्रँड लॉन्चेस आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन असे भरपूर कार्यक्रम होतील. याला जोडूनच १ एकरांवर पसरलेले, खूप मोठे 'क्युरेटेड फ्ली मार्केट' असेल, जिथे विविध पॉप-अप स्टॉल्स, इंडी ब्रँड्स असतील आणि अनेक




नवनवीन अनुभव घेता येतील. यामुळे याठिकाणी एक चैतन्यमय आणि सामाजिक सहभागाला प्रोत्साहन देणारे वातावरण निर्माण होईल, आणि ग्राहकांना याठिकाणी वारंवार भेट द्यावीशी वाटेल.

या लाँचबद्दल बोलताना भूमी वर्ल्डचे व्यवस्थापकीय संचालक श्री प्रकाश पटेल म्हणाले: "आउटलेट मॉल ऑफ इंडिया हे भिवंडीचे एका उत्साही रिटेल आणि मनोरंजन केंद्रामध्ये होत असलेल्या रूपांतराचे प्रतीक आहे. विशेषतः तरुण पिढीला आंतरराष्ट्रीय उत्पादने सहज उपलब्ध करून देणे हे आमचे उद्दिष्ट आहे. ग्राहकांना नामवंत ब्रँड्स, मनाला आनंद देणारी जागा आणि वर्षभर अतुलनीय मूल्य (डिस्काउंट) यांचा अनुभव घेता येईल, असा एक प्रीमियम आणि संघटित आउटलेट प्लॅटफॉर्म तयार करणे हे आमचे व्हिजन आहे."

या प्रकल्पामध्ये या प्रदेशातील सर्वात महत्त्वाकांक्षी 'फूड अँड बेव्हरेज' इकोसिस्टम विकसित करण्यात आली आहे, जी भिवंडीतील संघटित डायनिंग क्षेत्रातील मोठी उणीव भरून काढेल. येथील विशेष 'फूड अव्हेन्यू'मध्ये निवडक क्यूएसआर, फाईन डायनिंग आणि सहा 'रूफटॉप' रेस्टॉरंट्सचा समावेश असणार आहे. खरेदीबरोबरीनेच या सर्वांचा आनंद ग्राहकांना घेता येईल. येथील मुख्य आकर्षण म्हणजे २५,००० स्क्वेअर फूटमध्ये पसरलेली महाराष्ट्रातील एक सर्वात मोठी 'फ्लॅगशिप ब्रुअरी' असणार आहे. त्याचप्रमाणे

याठिकाणी २० हून जास्त 'फूड ट्रक्स' असतील. त्यामुळे अतिशय उत्साही वातावरणाचा अनुभव घेता येईल. याव्यतिरिक्त, येथे अत्याधुनिक 'गोल्फिंग' आणि 'गो-कार्टिंग' सुविधा देखील उपलब्ध असून, ग्राहकांना मनोरंजनाचा एक परिपूर्ण अनुभव मिळेल.

भूमी वर्ल्डच्या विस्तीर्ण परिसरामध्ये मोक्याच्या ठिकाणी असलेल्या या प्रकल्पाला समृद्धी महामार्ग आणि आगामी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ यांसारख्या प्रमुख पायाभूत सुविधांचा मोठा फायदा मिळणार आहे. याचा विस्तार भिवंडी, ठाणे, नवी मुंबई आणि मुंबईपर्यंत पसरलेला आहे. पुणे-नाशिक महामार्गावर स्थित असल्याने, मुंबई महानगर प्रदेशातून याठिकाणी सहज येणे-जाणे देखील सहजशक्य आहे.

## माणुसकीचा गोडवा! चिखलवर्धा येथे 'ईद मिलन' व 'मस्जिद परिचय' कार्यक्रमातून जोपासला जातीय सलोखा

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी - महेश पेन्दोर :** माणसाने माणसाशी माणसासारखे वागावे, हाच खरा धर्म असल्याचे सांगितले आहे. घाटंजी तालुक्यातील चिखलवर्धा येथे 'ईद मिलन' आणि 'मस्जिद परिचय' हा आगळावेगळा कार्यक्रम अत्यंत शांततेत आणि उत्साहात पार पडला. ईश्वर, अल्लाह आणि भगवान हे सर्व एकच असताना, आजचा माणूस जाती-धर्माच्या भिंतींमध्ये का अडकला आहे, असा मोलाचा संदेश या निमित्ताने देण्यात आला. जमाअते इस्लामी हिंद व समस्त मुस्लिम बांधवांच्या पुढाकाराने आयोजित या सोहळ्यात हिंदू-मुस्लिम बांधवांनी एकत्र येत शिरखुरम्याचा आस्वाद घेतला आणि माणुसकीचे दर्शन घडवले.



कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी आजच्या डिजिटल युगातील एका महत्त्वाच्या मुद्द्यावर प्रकाश टाकला. 'सोशल मीडिया युनिव्हर्सिटी'च्या माध्यमातून पसरवल्या जाणाऱ्या खोट्या माहितीमुळे समाजासमाजात द्वेष निर्माण होत असल्याची खंत यावेळी व्यक्त करण्यात आली. कोणताही मेसेज फॉरवर्ड करण्यापूर्वी त्याची पूर्ण सत्यता पडताळून पाहा आणि मनात दुसऱ्या धर्माविरुद्ध क्रोध निर्माण होऊ देऊ नका, असे कळकळीचे आवाहन उपस्थितांना करण्यात आले.नाशिकचे इस्लामिक विचारवंत प्रा. वाजीद अली खान आणि पुसदचे संत साहित्याचे अभ्यासक मा. सैय्यद सलमान यांनी आपल्या ओघवत्या भाषणातून एकता आणि एकमेकांबद्दलचे प्रेम हाच खरा राष्ट्रधर्म असल्याचे सांगितले. याप्रसंगी घाटंजीचे तहसीलदार विजय साळवे आणि पारव्याचे ठाणेदार हेमंत चौधरी यांची प्रमुख उपस्थिती होती. या अधिकाऱ्यांनीही समाजातील शांतता आणि एकतेचे महत्त्व पटवून दिले. चिखलवर्ध्यातील या उपक्रमाने केवळ चर्चाच केली नाही, तर 'मस्जिद परिचय'च्या माध्यमातून एकमेकांच्या संस्कृतीला जवळून समजून घेण्याची संधी दिली. एकमेकांना प्रेमाची मिठी मारून आणि शिरखुरम्याचा गोडवा चाखून सर्व धर्मीय बांधवांनी 'आम्ही सर्व एक आहोत' हाच संदेश आज चिखलवर्ध्यातून संपूर्ण जिल्ह्याला दिला आहे.


## २८ लाखांचा कर भरूनही 'भवन' कचऱ्याच्या विळख्यात!

### ७ महिन्यांचे वेतन थकल्याने घंटागाडी बंद; स्वच्छतेचा फज्जा

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर सिल्लोड:-** तालुक्यातील भवन येथील ग्रामस्थांनी जागरूक नागरिक म्हणून ३१ डिसेंबरपर्यंत तब्बल २८ लाख रुपयांचा कर ग्रामपंचायतीच्या खात्यात जमा केला. मात्र, इतका मोठा निधी उपलब्ध असतानाही केवळ प्रशासकीय नियोजनाच्या अभावामुळे ग्रामस्थांना मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे. गेल्या चार महिन्यांपासून गावातील कचरा संकलनाची 'घंटागाडी' बंद असल्याने सर्वत्र अस्वच्छता पसरली असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ग्रामपंचायतीने गावात कचरा व्यवस्थापनासाठी घंटागाडी सुरू केली होती. मात्र, संबंधित घंटागाडी चालकाचे



गेल्या सात महिन्यांपासून वेतन थकले आहे. आर्थिक विवंचनेत असलेल्या चालकाने अखेर काम थांबवण्याचा निर्णय घेतला. परिणामी, गावातील कचरा उचलण्याची प्रक्रिया पूर्णपणे ठप्प झाली असून, छत्रपती संभाजीनगर महामार्गाच्या कडेला कचऱ्याचे प्रचंड ढीग साचले आहेत. यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून पादचारी व वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

ग्रामपंचायत अधिकारी इजामुद्दीन शेख यांच्या मते, ग्रामपंचायतीला करापोटी २८ लाख रुपये मिळाले आहेत. मात्र, व्यवहारासाठी आवश्यक असलेल्या 'सही नमुना' प्रक्रियेअभावी आणि मासिक बैठकीतील निर्णयाअभावी निधी असूनही तांत्रिक अडचणींमुळे हा प्रश्न प्रलंबित आहे. प्रशासनाच्या या भूमिकेवर ग्रामस्थांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

**आंदोलनानंतरही परिस्थिती 'जैसे थे'**

यापूर्वी २७ जुलै २०२५ रोजी डिझेलअभावी घंटागाडी बंद पडल्याने उपसरपंच भारती दाभाडे यांनी 'भीक मागो' आंदोलन केले होते. त्यानंतर काही काळ सेवा सुरू झाली, मात्र आता पुन्हा वेतन थकीत असल्याने 'भवन'च्या स्वच्छतेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. प्रशासनाने तातडीने यावर तोडगा काढावा, अशी मागणी होत आहे.

## सिल्लोडमध्ये भगवान महावीर जयंती उत्साहात; शोभायात्रेत सुरेश बनकर यांचे अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर / सिल्लोड :** 'अहिंसा परमो धर्म:'चा संदेश देणारे जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांच्या जन्मकल्याणक (जयंती) महोत्सवानिमित्त मंगळवारी (दि. ३१) सिल्लोड शहरात भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या मंगलप्रसंगी भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सरचिटणीस तथा सिल्लोड-सोयगाव विधानसभा मतदारसंघाचे नेते सुरेश बनकर यांनी शोभायात्रेत सहभागी होऊन भगवान महावीरांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

अहिंसा, सत्य, अस्तेय आणि अपरिग्रह या पंचमहाव्रतांची शिकवण देणाऱ्या भगवान महावीरांच्या जयंतीनिमित्त शहरात



मंगळवारी सकाळपासूनच धार्मिक वातावरणाने चैतन्य निर्माण झाले होते. शहरातील मुख्य बाजारपेठ आणि प्रमुख मार्गावरून काढण्यात आलेल्या या शोभायात्रेत जैन समाज बांधवांचा उत्साह ओसंडून वाहत होता. यावेळी सुरेश बनकर यांनी भगवान महावीरांच्या स्तंभाचे पूजन केले आणि उपस्थित समाज बांधवांना महावीर जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. "भगवान महावीरांचे विचार हे जागतिक शांतता आणि कल्याणासाठी आजही मार्गदर्शक आहेत," अशा भावना त्यांनी यावेळी व्यक्त केल्या.या शोभायात्रेप्रसंगी ॲड. विजय मंडलेचा, नगरसेवक स्वप्नील शिनगारे यांच्यासह सकल जैन समाजातील मान्यवर, पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अतिशय शिस्तबद्ध आणि भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## युद्धजन्य संकटावर श्रद्धेची मात! पेणच्या बाप्पाची सातासमुद्रापार भव्य स्वारी; घराघरात घुमणार 'गणपती बाप्पा मोरया'चा जयघोष!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी** : ज्या हातांनी मातीला देवत्व दिलं आणि ज्या डोळ्यांनी मूर्तीत चैतन्य पाहिलं, त्या पेणच्या कलाकारांचा वारसा आज पुन्हा एकदा जागतिक क्षितिजावर झळकला आहे. 'पेण आणि गणेशमूर्ती' हे केवळ नाव नाही, तर ती एक भक्ती आहे, जी सीमा मानत नाही. इराण-इस्रायल युद्धाच्या धगधगत्या ज्वालांमुळे सागरी मार्गावर अनिश्चिततेचे ढग होते, पण बाप्पाच्या परदेशवारीचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे!

हा प्रवास सुरू होतो पेण शहर तसेच जोहे, हमरापूर तांबडशेत आणि कळवे यांसारख्या इवल्याशा गावांमधून. इथल्या साध्या पण कष्टाळू हातांनी घडवलेल्या कच्च्या मूर्ती जेव्हा पेणच्या मोठ्या कार्यशाळांमध्ये येतात, तेव्हा त्यांना खऱ्या अर्थाने 'रूप' मिळते. प्रसिद्ध मूर्तिकार निलेश समेळ यांच्या हातातून जेव्हा या मूर्तींना अंतिम साज चढवला जातो, तेव्हा त्या मूर्तींमधील तेज पाहून भक्तांचे डोळे पाणावतात. ही केवळ माती नाही, तर सातासमुद्रापार राहणाऱ्या भारतीयांसाठी मायभूमीशी जोडलेलं एक भावनिक नातं आहे. अनिवासी भारतीयांकडून देखील मोठ्या प्रमाणावर बाप्पाची मागणी होत असते.

बाप्पाचे यावर्षी चा प्रवास सोपा नव्हता. इराण आणि इस्रायलमधील युद्धजन्य परिस्थितीमुळे आंतरराष्ट्रीय सागरी वाहतुकीला मोठा फटका बसला. अनेक देशांचे मार्ग असुरक्षित झाले होते. मात्र, २५ दिवसांच्या मोठ्या प्रतीक्षेनंतर



आणि अनेक संकटांवर मात करत ७,०००मूर्तींची पहिली खेप जे एन पी ए बंदरातून कॅनडासाठी रवाना झाली आहे. पेन चा वापर केवळ कॅनडालाच नाही तर दुबई, अमेरिका, युके ,जर्मनी ,फ्रान्स, न्युझीलँड, थायलंड , ऑस्ट्रेलिया, मॉरिशस अशा अनेक देशात एप्रिल आणि मे महिन्यात टप्प्याटप्प्याने मूर्ती पाठवण्यात येणार आहेत विशेष म्हणजे यावर्षी ४ ते ५ फूट उंचीच्या मोठ्या मूर्तींना देखील मोठी मागणी असल्याचे मूर्तिकार निलेश समेळ यांनी सांगितले. युद्धाच्या भीतीमुळे काही मार्गांवर मर्यादा आले असल्या तरी जगभरातील गणेश भक्तांची ओढ काही कमी झालेली नाही यांच्या कार्यशाळेतून दरवर्षी सुमारे ५० हजार मूर्ती जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचतात युद्धाच्या परिस्थितीमुळे वाहतूक उशिराने सुरू झाली तरीही मान्सूनपूर्वी आमचा हा भक्तीचा अमूल्य वारसा भक्तांपर्यंत पोहोचवण्याचे आमचे ध्येय आहे दुबई इतर देशातही बाप्पा तितक्याच उत्साहात पोहोचतील असे निलेश समेळ यांनी सांगितले.

कधी मातीच्या कानातून तर कधी रंगांच्या उधळणीतून पेणच्या कलाकारांनी पुन्हा एकदा सिद्ध केले की बाप्पाचा आगमन जगाला शांतता आणि आनंदाचा संदेश देणारा असतं पेण शहरातून निघालेला हा बाप्पा आता लवकरच जगाच्या मोठ्या महान आगरांमध्ये विसावणार आहे.

## वाशिम बाजार समिती पुन्हा सुरू; शेतकऱ्यांचा मोठा उत्साह

**दैनिक युवक आधार**

**वाशिम, प्रतिनिधी :** वाशिम कृषी उत्पन्न बाजार समिती काही दिवसांच्या बंदीनंतर आज, ३० मार्चपासून, पुन्हा सुरू झाली आहे. बाजार उघडताच शेतकऱ्यांनी सोयाबीन आणि इतर पिकांचा मोठ्या प्रमाणावर माल विक्रीसाठी आणला . बाजार समितीचा हा उघडण्याचा निर्णय शेतकऱ्यांसाठी आर्थिक व्यवहार अधिक सुलभ करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरला आहे. सध्या सोयाबीन आणि गव्हाला हमीभावापेक्षा कमी दर मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये काही प्रमाणात असंतोष जाणवत आहे. तरीही, बाजार समितीच्या सुरू होण्यामुळे शेतकऱ्यांना आपला माल अधिक सुरक्षित आणि नियंत्रित




पद्धतीने विक्रीसाठी आणण्याची संधी मिळाली आहे.शेतकऱ्यांनी प्रशासनाच्या निर्णयावर प्रश्न उपस्थित करत महत्त्वाच्या विषयात वेळेवर कारवाई का झाली नाही, असा सवाल केला आहे. शेतकरी संघटना ठामपणे मागणी करत आहेत की प्रशासनाने तातडीने योग्य ती पावले उचलावी, जेणेकरून शेतकऱ्यांचा विश्वास, आर्थिक सुरक्षा आणि पिकांचा योग्य भाव राखला जाईल.

**प्रशासनाच्या निर्णयानंतर बाजार समिती सुरु**

वाशिम बाजार समिती १५ दिवस बंद ठेवण्याच्या निर्णयावर प्रशासनाने कडक भूमिका घेत व्यापारी व आडते असोसिएशनला नोटीस बजावली होती. प्रशासनाने ३० मार्चपासून खरेदी-विक्री तात्काळ सुरू करण्याचे आदेश दिले, नियम मोडल्यास कायदेशीर कारवाईचा इशारा दिला. बाजार बंदीमुळे शेतकऱ्यांना झालेले नुकसान थोड्याशा प्रमाणात टळले असले तरी काही शेतकऱ्यांनी 'बाजार बंद राहिल्यामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई कोण देणार?' असा प्रश्न उपस्थित केला आहे.

**कारंजा बाजार समिती नाणे टंचाईमुळे ३० मार्च ते ४ एप्रिल बंद**

नाणे टंचाईमुळे कारंजा येथील कृषी उत्पन्न बाजार समिती ३० मार्च ते ४ एप्रिलपर्यंत बंद राहणार असल्याचे प्रशासनाने निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे कारंजा तालुक्यातील शेतकऱ्यांनाही मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. बाजार बंद राहिल्यास खासगी व्यापारी कमी दरात शेतमाल खरेदी करून शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान करीत आहेत. स्थानिक शेतकरी संघटनांनी प्रशासनास योग्य तो तोडगा काढण्याची मागणी केली आहे, नाहीतर शेतकऱ्यांचा कोट्यवधींचा नुकसानीचा धोका वाढेल.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# जि.प.व.प्राथ.शाळा शेलगाव (राजगुरे) येथे, भेटवस्तूंचे लोकार्पण आणि सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी रिसोड. रणजीत ठाकूर** : दिनांक - 28/03/2026 रोज शनिवारला जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा शेलगाव राजगुरे येथे सन्माननीय ग्रामस्थांनी दिलेल्या भेट वस्तूंचा लोकार्पण सोहळा आणि सांस्कृतिक कार्यक्रम अतिशय यशस्वीपणे पार पाडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाशिम जिल्हा परिषदेचे कर्तव्यदक्ष शिक्षण अधिकारी आदरणीय संजयजी ससाने साहेब, तर कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून वाशिम जिल्ह्याचे उपशिक्षण अधिकारी आदरणीय बिरादार साहेब हे होते. प्रमुख अतिथी म्हणून शिरपूर पोलीस स्टेशनचे वानखेडे साहेब,खोडवे साहेब, वाशिम शिक्षक पतसंस्था विद्यमान संचालक आदरणीय मंचकरावजी तायडे सर,गावचे ग्रामसेवक, सरपंच, तंटामुक्ती अध्यक्ष, पोलीस पाटील,आणि शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष यांची विशेष उपस्थिती लाभली. सर्वप्रथम कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि प्रमुख पाहुणे यांनी महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन केले. दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली.कार्यक्रमाला उपस्थित असलेले अध्यक्ष सर्व प्रमुख पाहुणे यांचा गावातील प्रतिष्ठित नागरिकांनी यथोचित सत्कार केला. तदनंतर गावातील सुजान आणि जागरूक ग्रामस्थांनी शाळेच्या मूलभूत गोष्टींची पूर्तता म्हणून, स्वर्गीय भास्कररावजी देशमुख यांच्या स्मृती प्रित्यर्थ,एक उच्च प्रतीचे इन्व्हर्टर, गावातील प्रगतशील शेतकरी शिवाजीराव वाघ यांच्याकडून शाळेला चांगल्या क्वालिटीचे एक प्रिंटर, अल्पावधीतच पंचक्रोशीत नावाजलेले डॉक्टर अनंत भाग्यवंत यांच्याकडून शाळेला आहूजा कंपनीची साऊंड सिस्टिम,गावातील जागरूक



नागरिक नारायणराव जी वाघ, सेवानिवृत्त केंद्रप्रमुख आदरणीय गुलाबरावजी देशमुख सर, प्रगतशील शेतकरी श्री नागोरावजी वाघ तर्फे प्रत्येकी एक असे कारागिराकडून बनवून घेतलेले तीन कपाट शाळेला भेट स्वरूपात दिले. गावचे तंटामुक्ती अध्यक्ष नामदेवराव जी वाघ यांच्याकडून नीलकमल कंपनीच्या सहा खुर्च्या आणि भागवत रावजी इंगळे यांच्याकडून शाळेला एक व्हाईट बोर्ड, तसेच गावातील जागरूक नागरिकांनी शाळेला आठ सिमेंटची बाखडे भेट दिले. या सर्व भेट वस्तूंचा मान्यवरांच्या हस्ते लोकार्पण सोहळा पार पडला आणि सदरहू सुजान नागरिकांचा मान्यवरांनी यथोचित सत्कार केला.

त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष आदरणीय संजयजी ससाने सर यांनी अध्यक्षीय भाषणामध्ये त्यांच्या बुद्धीचातुर्याने प्रेक्षकांना जिंकून घेतले. बालकांच्या विकासासाठी प्रत्येक पालकांनी काय करायला हवे , त्याला पालक आणि शिक्षकांची जोड कशाप्रकारे असायला हवी हे त्यांनी एका सुंदर आणि मार्मिक गोष्टीतून स्पष्ट केले.आदरणीय साहेबांनी जिल्ह्यामध्ये राबवित असलेल्या उपक्रमाविषयी लोकांशी चर्चा केली. अभ्यासाशिवाय गत्यंतर नाही, असे त्यांनी इयत्ता दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना आवर्जून सांगून शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. रमेश रावजी वाघ यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामधून शाळेची दशा आणि दिशा, शाळेला लागणाऱ्या मूलभूत गोष्टी, याविषयी विचार व्यक्त केले. त्यांनी प्रास्ताविकामधून शाळेत एका सहाय्यक शिक्षकाची जागा रिक्त आहे शाळेला संरक्षण भिंत आणि दोन वर्ग खोल्यांची नितांत गरज आहे. सदरहू बाबी पूर्ण करण्याची गावकऱ्यांच्या वतीने अध्यक्षांना विनंती केली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन करून मान्यवरांना सांस्कृतिक कार्यक्रम बघण्यासाठी अतिथी कक्षामध्ये बसण्याची विनंती केली.

लहान मुलांचे नृत्य बघून मान्यवरांनी मुलांचे विशेष कौतुक केले. सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये जवळपास 26 नृत्य होते आणि शेवटपर्यंत शाळेच्या प्रांगणामधील सर्व प्रेक्षक जागेला खिळून होते. सर्व नृत्याला गावकऱ्यांनी भरभरून बक्षीसे दिली.असे एकूण 15480 रुपये बक्षिसांची रक्कम झाली.सदरहू रकमेतून विद्यार्थ्यांसाठी स्कूल बॅग किंवा चांगल्या प्रतीची वाटर बॉटल विकत घेण्याचे ठरवले. शेवटी कार्यक्रमाची सांगता आभार प्रदर्शनाने झाली. अशाप्रकारे शाळेतील हा कार्यक्रम बघून लोकांनी या कार्यक्रमासाठी हातभार लावणाऱ्या सर्व सन्माननीय व्यक्तींचे विशेष अभिनंदन तथा कौतुक अभिनंदन केले.

## व्ही.आय.टी.एम. महाविद्यालयात पदवी प्रदान सोहळा उत्साहात; विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**(प्रतिनिधी) : विश्वदीप कांबळे** : व्ही.आय.टी.एम. समाजकार्य व पत्रकारिता महाविद्यालयात पदवी प्रदान सोहळा मोठ्या उत्साहात आणि जल्लोषपूर्ण वातावरणात पार पडला. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत घेण्यात आलेल्या एम.एस.डब्ल्यू. (MSW) आणि एम.जे. (MJ) अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षातील 2025 मध्ये यशस्वीरित्या उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना यावेळी पदवी प्रदान करण्यात आली.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य हेमंत दुगाने सर होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात विद्यार्थ्यांनी मिळवलेले शिक्षण हे केवळ पदवीपुरते मर्यादित न ठेवता समाजहितासाठी उपयोगात आणावे, असे आवाहन केले. तसेच विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपत जबाबदार नागरिक म्हणून कार्य करावे, असा संदेशही त्यांनी दिला.

यावेळी विभाग प्रमुख प्रा. अशोक कुबडे सर, समाजकार्य विभागप्रमुख प्रा. सम्राट हटकर सर, मा. संघपाल कांबळे व शंतनू सोने यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमात पदवी प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद, समाधान आणि अभिमान स्पष्टपणे दिसून येत होता. महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेचा हा सोहळा एक उत्तम दाखला ठरला.

सोहळ्यास विद्यार्थ्यांसह पालक व महाविद्यालयीन शिक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

## सुरक्षा नियमांचा भंग; अपूर्ण डिव्हायडरमुळे वाहन पलटी – जबाबदारांवर कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**

**देवणी तालुका प्रतिनिधी/पांडुरंग कदम** : देवणी शहरातील निलंगा–उदगीर मुख्य मार्गावर सुरू असलेल्या डिव्हायडरच्या कामात गंभीर सुरक्षा नियमांचे उल्लंघन झाल्याने अपघाताची घटना घडली आहे. रस्ते सुरक्षा मानकांनुसार डिव्हायडरची किमान उंची २.५ फूट असणे आवश्यक असून, एकच फुटाची उंची काम सुरू असलेल्या ठिकाणी सुरुवातीपासूनच स्पष्ट सूचना फलक तसेच डिव्हायडरवर रेडियम पट्टी लावणे कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक आहे.




मात्र संबंधित ठिकाणी या नियमांकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाल्याचे दिसून आले. योग्य सूचना फलकांचा अभाव आणि अपूर्ण डिव्हायडरमुळे ३० मार्च २०२६ रोजी सायंकाळी सुमारे साडेनऊ वाजता एका चारचाकी वाहनाचा अपघात होऊन वाहन पलटी झाले. या दुर्घटनेत सुदैवाने जीवितहानी टळली असली तरी काही जणांना किरकोळ दुखापत झाली आहे.

प्राथमिक माहितीनुसार, हा अपघात निष्काळजीपणा आणि अपुऱ्या सुरक्षा उपाययोजनांमुळे घडल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. संबंधित कंत्राटदार, अभियंते तसेच देवणी नगरपंचायत प्रशासनाची जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर तातडीने कायदेशीर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.दरम्यान, देवणी नगरपंचायतचे माजी गटनेते व अनुभवी सिव्हिल इंजिनिअर जमीर तांबोळी यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. त्यांनी सांगितले की, "रस्ते बांधकामात भारतीय रस्ते काँग्रेस (IRC) व सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD) यांच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करणे अनिवार्य आहे.

सूचना फलक, बॅरिकेड्स आणि योग्य उंचीचे डिव्हायडर नसणे ही अत्यंत गंभीर बाब असून, याकडे दुर्लक्ष करणे दंडनीय आहे."या प्रकरणी संबंधित विभागाने तातडीने चौकशी करून दोषींवर भारतीय दंड संहिता (IPC) तसेच मोटार वाहन कायद्यांतर्गत कठोर कारवाई करावी, तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## ग्राहक हक्कांना नवी ताकद : ॲड.तुषार झेंडे यांची बारामती मंडळावर नियुक्ती

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय** : विद्युत नियामक आयोगाच्या बारामती मंडलाच्या सदस्यपदी ॲड.तुषार देविदास झेंडे यांची नियुक्ती झाली आहे. ग्राहक हक्क व वीज कायद्यावरील त्यांच्या अनुभवाची दखल घेत ही निवड करण्यात आली.महावितरणचे बारामतीचे अधीक्षक अभियंता दीपक लहामगे यांनी झेंडे यांचे अभिनंदन केले.या वेळी विभागातील अधिकारी व कर्मचारी, अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



ॲड. तुषार झेंडे हे ग्राहक हक्क,कायदेशीर जनजागृती व सामाजिक कार्यात सक्रिय असून त्यांच्या नियुक्तीमुळे ग्राहक तक्रार निवारण यंत्रणा अधिक सक्षम होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.झेंडे यांनी वीज अधिनियम २००३ व एमईआरसी नियमानुसार ग्राहकांना न्याय मिळवून देण्याचा निर्धार व्यक्त केला. झेंडे यांच्या नियुक्तीने ग्राहकांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी महत्त्वाची ठरणार असून स्थानिक पातळीवर न्याय मिळवून देण्यास नवी दिशा मिळणार आहे असं मत ग्राहक पंचायत संघटनेच्या वतीने व्यक्त करण्यात आले आहे.

## नाविन्यपूर्ण शिक्षणाच्या शोधात शिक्षक पोहचले पुणे जिल्ह्यात; विद्यार्थ्यांच्या ज्ञानजिज्ञासेसाठी जागतीक नावलौकिक प्राप्त शाळेला भेट

**दैनिक युवक आधार**

**शिरूर कासार** : येथील एकलव्य इंग्लिशस्कुलच्या विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या युगातील नवनवे ज्ञान मिळावे यासाठी शाळेच्या अध्यापकांनी पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात जालिंदरनगरमधील शाळेला भेट दिली. जागतीक पातळीवरील नावलौकिक प्राप्त शाळेत जाऊन तेथील शिक्षणाबाबतचे तंत्र समजून घेतले.

एकलव्यचे मार्गदर्शक प्रा . सचिन सानप हे मॉडर्न एज्युकेशन सोसायटी पुणे येथील विश्वस्थ व मराठी भाषा विभागातील विशेष कार्य अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांचे मध्यस्तीने एकलव्य इंग्लिश स्कुलच्या अध्यापकांना थेट जागतीक स्तरावरील नावलौकिक प्राप्त असलेल्या जालिंदरनगरमधे जाऊन तेथील शिक्षणपध्दतीविषयी माहिती आत्मसात करून घेतली. विषय मित्र , पीअर लर्निंग संकल्पना, प्रयोगशिल विद्यार्थी - केंद्रीत पध्दती शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्यासाठी कशी प्रभावी ठरते? हे जाणून घेतले.खेड



तालुक्यातील जालिंदरनगरमधे जि. प . शाळेचे दत्तात्रय वारे यांच्या अथक प्रयत्नातून शाळा आज जागतीक स्तरावर नावलौकिक प्राप्त ठरली आहे. तेथील शिक्षण पध्दतीचा आपल्या विद्यार्थ्यांना देखील फायदा व्हावा यासाठी एकलव्यचा पूर्ण शिक्षकवर्ग गेला होता. एकंदरीत हे सर्व पाहून शिक्षकवर्ग भारावून गेला होता. थेट वारे गुरूजींशी संवाद साधून नाविन्यपूर्ण शिक्षणाचे धडे घेतले. बंद पडण्याच्या उंबरठ्यावर असलेल्या जि. प. शाळेला नवसंजिवनी देण्याचे काम वारे गुरूजींनी करून या शाळेला विशेष महत्व प्राप्त करून दिले आहे.

एकलव्यचे मुख्याध्यापक निलेश पोकळे यांनी आपले सर्व सहकारी शिक्षक बरोबर नेले होते. शिक्षण संस्कार आणि तंत्रज्ञान यांची सुंदर सांगड घालत उज्वल सक्षम व स्पर्धात्मक पिढी घडविण्यासाठी ही शैक्षणीक सहल निश्चित फलद्रुप होईल असा विश्वास निलेश पोकळे यांनी व्यक्त केला.

# सेवापूर्ती गौरव ऋषितुल्य मार्गदर्शकाचे अष्टपैलू पर्व: प्राचार्य ज्ञानेश्वर काकडे

### विज्ञान, खेळ अन् संगीताची त्रिवेणी सांगड; सहकार महर्षी माणिकराव पालोदकर विद्यालयाच्या 'मार्गदर्शक' पर्वाची प्रदीर्घ सेवापूर्ती

**योगेश रामचंद्र पालोदकर**

**(जिल्हा प्रतिनिधी, दैनिक युवक आधार, छत्रपती संभाजीनगर)**

शिक्षण क्षेत्रात एखादा शिक्षक जेव्हा आपली प्रदीर्घ आणि निष्कलंक सेवा पूर्ण करून निवृत्त होतो, तेव्हा केवळ एक शासकीय पद रिक्त होत नसते, तर ज्ञानाचा एक अखंड प्रवाह आणि सुसंस्कारांची एक मोठी पाठशाळा विसावत असते. राजर्षी शाहू शिक्षण संस्था सिल्लोड द्वारा संचालित, सहकार महर्षी माणिकराव पालोदकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पालोद येथील अजातशत्रू, कर्तव्यदक्ष आणि विद्यार्थ्यांचे लाडके मार्गदर्शक प्राचार्य श्री. ज्ञानेश्वर संपतराव काकडे सर यांचा मंगळवार, दि. ३१ मार्च २०२६ रोजी भव्य सेवापूर्ती गौरव सोहळा संपन्न झाला. त्यांच्या या सेवानिवृत्तीनिमित्त, त्यांच्याच एका कृतज्ञ



विद्यार्थ्याने पत्रकारितेच्या माध्यमातून वाहिलेली ही शब्दरूपी 'भावनांजली'...

**विज्ञानाची दृष्टी आणि जीवनाचे तत्त्वज्ञान**

काकडे सरांनी आम्हाला केवळ विज्ञानाचे नियम शिकवले नाहीत, तर जीवनाचे 'रसायनशास्त्र' कसे समतोल राखायचे, याचे बाळकडू दिले. विज्ञानाने आम्हाला पुराव्यासह सत्याचा शोध घ्यायला शिकवले आणि सरांनी त्या सत्यावर ठाम राहण्याची नैतिक वृत्ती दिली. विज्ञानातील कठीण सिद्धांत सरांनी आपल्या ओघवत्या शैलीत इतक्या सोप्या पद्धतीने उलगडले की, ते केवळ पुस्तकी ज्ञान न राहता आमच्या जगण्याचा अविभाज्य भाग बनले. शोधवृत्ती आणि तर्कनिष्ठ विचार हे त्यांच्या अध्यापनाचे मुख्य पैलू राहिले आहेत.

**मैदानावरील जिद्द आणि खेळाडूवृत्ती**

सरांचे कार्य केवळ चार भिंतींतील अध्यापनापुरते मर्यादित नव्हते. विद्यालयाच्या मैदानावर सरांची शिट्टी वाजली की, खेळाडूंमध्ये एक वेगळाच उत्साह संचारत असे. खो-खो आणि कबड्डी यांसारख्या मातीतल्या खेळांवर सरांचे अफाट प्रेम! मी स्वतः सरांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयाच्या खो-खो संघात सक्रिय होतो. सरांनी दिलेल्या तंत्रशुद्ध प्रशिक्षणाच्या जोरावरच आमच्या संघाने विभागीय स्तरापर्यंत मजल मारली होती. तो मैदानी संघर्ष आणि 'हार न मानण्याची जिद्द' सरांनी आमच्यात अशा रीतीने रुजवली की, आज आयुष्याच्या कोणत्याही कठीण प्रसंगात लढताना आम्हाला भीती वाटत नाही. क्रीडा क्षेत्रात पालोदचे नाव उज्ज्वल करण्यात सरांचा सिंहाचा वाटा आहे.

**संगीताची ओढ आणि सुसंस्कृत स्वभाव**

विज्ञानाची तर्कशुद्ध दृष्टी आणि खेळाडूवृत्ती जोपासणाऱ्या सरांच्या व्यक्तिमत्त्वाला संगीताचीही एक हळवी जोड आहे. विज्ञानाचा तर्क, खेळाची जिद्द आणि संगीताचा गोडवा यांचा असा त्रिवेणी संगम असलेले शिक्षक विरळाच! सरांच्या या रसिक स्वभावामुळेच त्यांच्या प्रशासकीय कामात एक प्रकारची मधुरता, सर्जनशीलता आणि कमालीचा संयम पाहायला मिळाला. सरांचे व्यक्तिमत्त्व हे खऱ्या अर्थाने अष्टपैलू आणि समृद्ध राहिले आहे.

**संस्कारांची शिदोरी आणि कृतज्ञता**

आज मी पत्रकारितेच्या क्षेत्रात काम करत असताना, माझ्या लेखणीत जी सत्यनिष्ठा आणि वैचारिक स्पष्टता आहे, त्याचे संपूर्ण श्रेय काकडे सरांच्या संस्कारांना जाते. विज्ञानाने दिलेली 'सत्यशोधक वृत्ती', खेळाच्या मैदानाने दिलेली 'लढाऊ वृत्ती' आणि संगीताने दिलेला 'संयम' आज माझ्या व्यावसायिक जीवनाचा भक्कम पाया आहे. राजर्षी शाहू शिक्षण संस्थेच्या या आदर्श विद्यालयात आणि एका ऋषितुल्य प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली मी घडलो, याचा मला सार्थ अभिमान वाटतो.

**प्रशासकीय समन्वय आणि आदर्श**

प्राचार्य म्हणून सरांचा कार्यकाळ हा अत्यंत पारदर्शक, शिस्तबद्ध आणि प्रशासकीयदृष्ट्या वस्तुनिष्ठ राहिला. संस्थेचे अध्यक्ष मा. प्रभाकरराव पालोदकर आणि सचिव मा. डॉ. राहुलजी पालोदकर यांच्या मार्गदर्शनाखाली, एक आदर्श शैक्षणिक प्रशासन आणि सुसंस्कृत शाळा कशी असावी, याचा एक उत्तम 'समन्वय' त्यांनी आपल्या कार्यकाळात साधून दाखवला. आज काकडे सर अधिकृतपणे शालेय सेवेतून निवृत्त झाले असले, तरी त्यांनी घडवलेल्या पिढ्या आज विविध क्षेत्रांत आपल्या कार्याचा ठसा उमटवत आहेत. सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वृंद आणि हजारो विद्यार्थ्यांच्या वतीने सरांचे पुढील आयुष्य आरोग्यदायी आणि सुखमय जावो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

# जिल्हाधिकाऱ्यांची गॅस एजन्सीला भेट; ग्राहकांशी संवाद

## गॅस वितरणाचा दैनंदिन आढावा, अनावश्यक गर्दी टाळण्याचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/प्रतिनिधी अकोला :** जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी गॅस एजन्सीला भेट देऊन गॅस सिलेंडर वितरणाचा आढावा घेतला. नागरिकांना वेळेत गॅस सिलेंडर उपलब्ध करण्याबाबत आवश्यक उपाययोजना करण्यात येत असून पेट्रोलियम कंपन्यांशी दैनंदिन आढावा घेण्यात येत आहे. नागरिकांनी गॅस एजन्सीमध्ये अनावश्यक गर्दी करू नये, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले.

यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी रवींद्र यन्नावार व इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. एचपी अकोला गॅस एजन्सी तसेच मालीवाल भारत गॅस एजन्सी येथे भेट देऊन वितरणाबाबत आढावा घेण्यात आला. घरगुती गॅसचा तुटवडा नसून ग्राहकांची केवायसी सुध्दा होत आहे.

गॅस एजन्सीमध्ये गॅस घेण्याकरिता आलेल्या नागरिकांसोबत जिल्हाधिका-यांनी संवाद साधला. नागरिकांच्या गॅस सिलेंडर वितरणाबाबत विचारणा करण्यात आली. गॅस




सिलेंडर वेळेत मिळत असल्याबाबत नागरिकांनी सांगितले.भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता नागरिकांनी गॅस एजन्सीमध्ये अनावश्यक गर्दी करू नये. कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. शासन, प्रशासन आपल्या सोबत आहे, नागरिकांना वेळेत गॅस सिलेंडर उपलब्ध करण्याबाबत आवश्यक उपाययोजना करण्यात येत असून पेट्रोलियम कंपन्यांशी दैनंदिन आढावा घेण्यात येत आहे. कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, सर्व नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे याबाबत आवाहन यावेळी करण्यात आले.

# नागपूर मध्यवर्ती कारागृहातील महिला बंदयांसाठी हस्तकला व लिपण आर्ट प्रशिक्षणाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राहुल मडावी/ नागपूर** : "सुधारणा पुनर्वसन" हे महाराष्ट्र कारागृहाचे ब्रिद असुन कारागृहातील बंदयांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी कारागृहात विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात येतात. मा. श्री. सुहास वारके, अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे, मा. श्री. योगेश देसाई, विशेष कारागृह महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली नागपूर मध्यवर्ती कारागृह येथे महिला बंदयांसाठी पिडीलाईट फेविक्रिल इंडीया, नागपूर या संस्थेमार्फत "हस्तकला व लिपण आर्ट प्रशिक्षणाचे" आयोजन करण्यात आले होते.

सदर प्रशिक्षणाकरीता कारागृहातील 80 महिला बंदयांनी सहभाग घेतला होता. प्रशिक्षणादरम्यान महिला बंदयांनी



फेब्रिक पाऊच, टोट बॅग, क्ले ज्वेलरी, वारली पेंटींग व क्ले पेपर वेट इत्यादी सुबक व आकर्षक वस्तु तयार केल्या. महिला बंदयांनी तयार केलेल्या सदरच्या वस्तु कारागृहाचे विक्री केंद्रामध्ये विक्रीकरीता ठेवण्यात आल्या होत्या. सदर वस्तुंची मोठया प्रमाणात विक्री झालेली असुन कारागृहाचे उत्पन्नात भर पडली आहे.

बंदयांनी तयार केलेल्या वस्तु समाजातील लोकांपर्यंत पोहचाव्यात व बंदयांना देखील कारागृहात रोजगार उपलब्ध व्हावा, तसेच कारागृहातुन बंदी मुक्त झाल्यानंतर स्वत:चे व कुटुंबाचे पालन-पोषण करण्यासाठी रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी कारागृहात बंदयांना विविध प्रकारचे प्रशिक्षण देण्यात येते.

पिडीलाईट फेविक्रिल इंडीया, नागपूर या संस्थेमार्फत हस्तकला व लिपण आर्ट प्रशिक्षण यशस्वीरित्या पुर्ण केलेल्या कारागृहातील महिला बंदयांना आज दिनांक 31.03.2026 रोजी प्रमाणपत्र वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमाकरीता कारागृह अधीक्षक श्री. वैभव सु. आगे, अतिरिक्त अधीक्षक, श्रीमती दिपा आगे, प्रमुख पाहुणे ॲड. गणेश खानझोडे, उच्च न्यायालय, नागपूर, ॲड. कौस्तुभ लुले, ॲड. गौरव खोंड, पिडीलाईट फेविक्रिल इंडीया, नागपूर या संस्थेच्या प्रशिक्षक श्रीमती प्राजक्ता जोगळेकर, यांचे हस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

सदर कार्यक्रमाकरीता श्री. श्रीधर काळे, उपअधीक्षक, श्री. आनंद पानसरे, वरिष्ठ तुरुंगाधिकारी, श्री. वामन निमजे, तुरुंगाधिकारी श्रेणी-1, श्री. नितीन क्षिरसागर, तुरुंगाधिकारी श्रेणी-1, श्री. भिमराव राऊत, तुरुंगाधिकारी श्रेणी-1, श्रीमती मिना लाटकर, प्रयास सामाजिक कार्यकर्ता, श्रीमती दुर्गा शहारे, हवालदार व इतर महिला कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती स्वाती भगत, शिक्षिका व आभार प्रदर्शन श्रीमती मिना लाटकर, प्रयास सामाजिक कार्यकर्ता, यांनी केले.

### सिल्लोड पालिकेत विकासकामांसह सण-उत्सवांच्या नियोजनावर भर

# नगराध्यक्ष अब्दुल समीर यांच्या अध्यक्षतेखाली सर्वसाधारण सभा; भाविकांच्या सुविधेसाठी यंत्रणा सज्ज

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर /सिल्लोड :** शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानली जाणारी सिल्लोड नगर परिषदेची सर्वसाधारण सभा सोमवारी (दि. ३०) नगराध्यक्ष अब्दुल समीर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या सभेत शहरातील प्रलंबित विकासकामांचा आढावा घेण्यासोबतच आगामी सण, उत्सव आणि सामाजिक कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर नागरी सुविधा पुरवण्याबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

सभेच्या सुरुवातीला शहरातील रस्ते, पाणीपुरवठा आणि इतर पायाभूत सुविधांच्या कामांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. शहराचा विकास आराखडा डोळ्यासमोर ठेवून सुरू असलेली कामे दर्जेदार आणि विहित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.



एप्रिल महिन्यात श्री हनुमान जयंती, श्री म्हसोबा महाराज यात्रा महोत्सव, महात्मा ज्योतिबा फुले जयंती, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, अक्षय तृतीया, परशुराम जयंती, महात्मा बसवेश्वर जयंती तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती यांसारखे महत्त्वाचे सण व उत्सव आहेत. या काळात शहरात भाविकांची मोठी गर्दी होणार असल्याने पाणीपुरवठा, स्वच्छता, पथदिवे आणि सुरक्षेसाठी जादा सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याबाबत नगराध्यक्ष अब्दुल समीर यांनी प्रशासनाला स्पष्ट निर्देश दिले. कोणत्याही नागरिकाची किंवा भक्ताची गैरसोय होणार नाही, यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वय राखून काम करावे, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

या सभेला उपनगराध्यक्ष विठ्ठल सपकाळ, मुख्याधिकारी कारभारी दिवेकर, शिवसेना गटनेता सुधाकर पाटील, नगरसेवक रउफ बागवान, नंदकिशोर सहारे, सिद्धेश्वर आहेर, आसिफ बागवान, राजश्री निकम, अकिल वसईकर, विशाल पाटील, सुधाकर गायकवाड, जुम्मा खा पठाण, सत्तार हुसेन, शेख मोहम्मद कय्युम, सुनील दुधे, डॉ. फेरोज खान, मनोज झंवर, मिर्झा चांदबेग, अशोक बन्सोड, जितेंद्र आरके, नूर मोहम्मद कुरेशी, इम्रान शेख, बबलू पठाण, शेख बाबू आदींसह नगर परिषदेचे विविध विभागप्रमुख उपस्थित होते.

# २९ वर्षांची प्रदीर्घ सेवा पूर्ण करून इंग्रजी विषयाचे ज्येष्ठ शिक्षक सुभदेव पाटील निवृत्त

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/ विजय काळे** : सोयगाव—जिल्हा परिषद प्रशाला सोयगाव येथील माध्यमिक विभागातील ज्येष्ठ, आदर्श व विद्यार्थीप्रिय शिक्षक आदरणीय सुखदेव वामन पाटील सर यांनी आपल्या २९ वर्षांच्या प्रदीर्घ आणि समर्पित सेवेनंतर आज सेवानिवृत्ती स्वीकारली. पाटील सर यांनी दिनांक ११ जून १९९७ रोजी या शाळेत रुजू होत आपल्या अध्यापन सेवेला सुरुवात केली होती. तेव्हापासून आजपर्यंत त्यांनी इंग्रजी विषयाचे अत्यंत प्रभावी व मनापासून अध्यापन करत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि वैयक्तिक विकासात मोलाचे योगदान दिले.आपल्या सेवाकाळात त्यांनी केवळ शालेय अभ्यासक्रमापुरते मर्यादित न राहता विविध सहशालेय उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर



दिला.त्यांच्या मार्गदर्शनाखाली घडलेले अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रात यशस्वीपणे कार्यरत असून देशसेवेत योगदान देत आहेत. पाटील सर यांचा स्वभाव जरी वरून कडक वाटत असला तरी अंतःकरणाने ते अत्यंत प्रेमळ, जिव्हाळ्याचे आणि विद्यार्थ्यांप्रती समर्पित होते. जसे नारळ बाहेरून कठीण पण आतून गोड असते, त्याचप्रमाणे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने विद्यार्थ्यांना शिस्त,मेहनत,प्रामाणिकपणा आणि चांगले संस्कार दिले.

विद्यार्थ्यांना योग्य दिशा देणे, त्यांना प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या यशात आनंद मानणे हे त्यांचे वैशिष्ट्य होते. त्यामुळेच ते विद्यार्थी,शिक्षक व पालकांच्या मनात एक आदर्श शिक्षक म्हणून सदैव स्मरणात राहतील.

आज त्यांच्या निरोप समारंभ प्रसंगी शाळेत भावनिक वातावरण निर्माण झाले होते. उपस्थित सर्वांनी त्यांच्या कार्याचा गौरव करत त्यांना पुढील आयुष्यासाठी उत्तम आरोग्य,आनंद आणि दीर्घायुष्याच्या शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ व शिक्षक मित्र परिवार, मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंद, शाळा व्यवस्थापन समिती तसेच माजी विद्यार्थी संघ,जिल्हा परिषद प्रशाला सोयगाव यांच्या वतीने सुखदेव वामन पाटील सर यांचा सत्कार करण्यात आला.मा .पाटील सर यांचे कार्य, त्यांचा आदर्श आणि त्यांनी दिलेले संस्कार पुढील पिढ्यांना सदैव प्रेरणा देत राहतील,अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# तब्बल ४६ मतांनी दणदणीत विजय! शोभाताई झनक यांची जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संचालकपदी ऐतिहासिक निवड

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे /वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अत्यंत प्रतिष्ठेच्या निवडणुकीत रिसोड येथील श्रीमती शोभाताई सुभाषराव झनक (काकू) यांनी तब्बल ४६ मतांच्या प्रचंड फरकाने दणदणीत विजय मिळवत संचालकपदावर आपली छाप उमटवली आहे. या विजयामुळे त्यांच्या समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

या निवडणुकीत एकूण ७४ मतदारांनी सहभाग नोंदवला. त्यामध्ये शोभाताई झनक यांना तब्बल ५९ मते मिळाली, तर त्यांचे प्रतिस्पर्धी डॉ. विठ्ठल पाचरने यांना १३ मतांवर समाधान मानावे लागले. दोन मते बाद ठरली.



या निकालातून झनक यांचे वर्चस्व स्पष्ट झाले असून मतदारांनी त्यांच्यावर दाखवलेला विश्वास ठळकपणे दिसून

> **"हा विजय माझा नसून सर्व मतदारांचा आहे. त्यांनी दाखवलेल्या विश्वासाला मी निश्चितपणे पात्र ठरेन. बँकेच्या माध्यमातून सर्वसामान्य शेतकरी व नागरिकांच्या हितासाठी काम करणार आहे."**
> **— श्रीमती शोभाताई सुभाषराव झनक**

आला.शोभाताई झनक यांच्या विजयामुळे रिसोड तालुक्यात विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या कार्यशैलीवर आणि जनसंपर्कावर मतदारांनी शिक्कामोर्तब केल्याचे या निकालातून स्पष्ट होते. बँकेच्या आगामी कारभारात त्यांच्या नेतृत्वाखाली विकासात्मक निर्णयांना गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.दरम्यान, वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या इतर जागांवरही निवडणुकीचे निकाल जाहीर झाले असून विविध तालुक्यांमधून पुढील उमेदवार विजयी झाले आहेत :

मंगरुळपीर : राम सुभाषराजी ठाकरे
वाशिम : धनंजय गोरे
रिसोड : श्रीमती शोभाताई सुभाषराव झनक
मालेगाव : नितीन दिलीप जाधव
कारंजा : विश्वनाथ ताथोड
मानोरा : अरविंद पाटील (अविरोध)

या सर्व विजयी उमेदवारांचेही विविध स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे. विशेषतः शोभाताई झनक यांच्या विजयाने या निवडणुकीत सर्वाधिक लक्ष वेधून घेतले आहे.

# प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेची खोरोची शाखेचे मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय :** प्रहार दिव्यांग क्रांती संघटना इंदापूर तालुका व शहर यांच्या वतीने खोरोची येथे शाखेचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. या कार्यक्रमास पुणे जिल्हाध्यक्ष शरद जाधव,जिल्हा उपाध्यक्ष सुभाष इंगोले, जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष दिवेकर,इंदापूर तालुका अध्यक्ष अनंतराव गायकवाड,तालुका महिला अध्यक्ष सूक्षला ढाणे, तालुका सचिव रामदास चव्हाण,तालुका उपाध्यक्ष बाळासाहेब जामदार,तालुका महिला उपाध्यक्ष रूपालीताई जगताप,तालुका खजिनदार भारत शेंडे, तालुका सहखजिनदार युनुस शेख, तालुका संपर्कप्रमुख महेश्वर जगताप,दौंड तालुका संघटक दादा ढमे उपस्थित होते.

खोरोची शाखेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये अध्यक्षपदी मनीषाताई नगरे, उपाध्यक्षपदी उर्मिलाताई पाटील,सचिवपदी राजन नगरे,सहसचिवपदी ताई मदने,खजिनदारपदी राजेंद्र चव्हाण ,सहखजिनदारपदी अरविंद कदम यांची निवड करण्यात आली.सदस्य म्हणून रियाज मुलानी,सचिन हेगडकर,माया कुंभार,राजेंद्र किसवे,सागर कदम,सुरज जाधव,लखन जाधव, सोमनाथ मोरे,प्रणिता देवकर,विघ्नेश हेगडकर यांचा समावेश आहे.सामाजिक कार्यकर्ते व ग्रामस्थांचा सहभाग या कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते संजय भाऊ चव्हाण,माजी सरपंच राजू भाळे,राहुल कांबळे,सतीश काका हेगडकर,ग्रामपंचायत सदस्य विशाल देवकर,सौ. अर्चना गोरड, महिला बचत गटातील आस्मा मुलानी,अरुणा साठे,शोभा भोसले,सुरेखा नगरे,गौरी भोसले तसेच आरोग्यसेविका मोहिनी मिसाळ उपस्थित होत्या.या शाखेच्या स्थापनेमुळे दिव्यांग बांधवांच्या प्रश्नांना अधिक बळ मिळणार असून संघटनेचे कार्य गावागावात पोहोचेल,अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.उपस्थित मान्यवरांनी नव्या पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा देत संघटनेच्या कार्याला पाठबळ देण्याचे अहवान केले.

# कबड्डी खेळाडूंना स्पोर्ट्स किट्सचे वाटप

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेच्या अनुषंगाने रायगड जिल्हा पुरुष व महिला कबड्डी संघातील प्रत्येक खेळाडूला श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने संपूर्ण स्पोर्ट्स किट्स प्रदान करण्यात आले.लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखालील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्यावतीने हा उपक्रम राबविण्यात आला. खेळाडूंना दर्जेदार क्रीडा साहित्य उपलब्ध करून देत त्यांच्या तयारीस चालना देण्याचा या उपक्रमाचा उद्देश होता.यावेळी आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षक शरद कदम, छत्रपती पुरस्कार विजेते सूर्यकांत ठाकूर, संघ







व्यवस्थापक प्रमोद म्हात्रे, क्रीडा प्रशिक्षक विनोद नाईक तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते. या उपक्रमामुळे खेळाडूंमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून आगामी स्पर्धेसाठी त्यांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होणार आहे. दिनांक २ एप्रिल ते ६ एप्रिल २०२६ दरम्यान सिन्नर (जि. नाशिक) येथे होणाऱ्या राज्यस्तरीय अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेसाठी रायगड जिल्हा पुरुष व महिला कबड्डी संघ दिनांक १ एप्रिल रोजी सिन्नर, नाशिक येथे रवाना होणार आहे.

# योजना सरकारी, लूट मात्र खासगी! घाटंजी तालुक्यातील 'लाडक्या बहिणीं'चा गॅस एजन्सीकडून छळ

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी - महेश पेन्दोर**

**घाटंजी:** शासनाने महिलांसाठी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' सारख्या योजना सुरू करून त्यांना आर्थिक आधार देण्याचा प्रयत्न केला असला, तरी दुसरीकडे गॅस एजन्सीच्या मनमानी कारभारामुळे ग्रामीण भागातील महिलांचे बजेट कोलमडले आहे. घाटंजी तालुक्यातील अनेक खेडेगावात सध्या इंडियन गॅसचा मोठा तुटवडा जाणवत असून, सर्वर डाऊन असल्याचे कारण सांगून ग्राहकांना ताटकळत ठेवले जात आहे. विशेष म्हणजे, घाटंजी तालुक्यातील अनेक गावांना किनवट तालुक्यातील मांडवी येथील गॅस एजन्सीशी जोडण्यात आले आहे. पारवा ते मांडवी हे ३० किलोमीटरचे अंतर कापून गॅस पोहोचवणे एजन्सीला कठीण जात असल्याचे चित्र आहे, मात्र याचा नाहक फटका सामान्य नागरिकांना बसत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गॅस सिलेंडरचा अधिकृत दर ९५४ रुपये असतानाही, गॅस एजन्सीकडून ग्रामीण भागातील ग्राहकांकडून चक्क १००० ते ११०० रुपये उकळले जात आहेत. वाहतूक खर्च आणि इतर कारणे सांगून ही लूट उघडपणे सुरू आहे. एकीकडे सरकार महिलांच्या खात्यात १५०० रुपये जमा करून त्यांना सक्षम करण्याचा दावा करत आहे, तर दुसरीकडे त्याच पैशातून गॅस एजन्सी मालक जास्तीचे पैसे उकळून गरिबांच्या खिशावर दरोडा टाकत आहेत. बुकिंग करूनही अनेक दिवस गॅस मिळत नाही आणि मिळाला तर तो चढ्या दराने घ्यावा लागतो, अशा दुहेरी संकटात घाटंजीतील जनता अडकली आहे.

प्रशासकीय यंत्रणेचे याकडे पूर्णपणे दुर्लक्ष होत असून, गॅस एजन्सी आपला कोटा पूर्ण करण्यासाठी ग्राहकांना वेठीस धरत आहेत. जर ही लूट अशीच सुरू राहिली, तर शासनाच्या योजनांचा फायदा नक्की कोणाला होतोय, असा संतप्त सवाल आता नागरिक विचारत आहेत. याप्रकरणी जिल्हा पुरवठा विभागाने तातडीने लक्ष घालून दोषी एजन्सीवर कारवाई करावी आणि घाटंजी तालुक्यातील गावांना जवळच्या केंद्रातून सुरळीत पुरवठा करावा, अशी मागणी आता जोर धरत आहे.

# हिंद टर्मिनल कंपनीने अडविला शेतकऱ्यांचा पारंपारिक मार्ग !

## शेतावर जाण्याचे मार्ग खुले करावेत. कळंबुसरे-चिरनेर शेतकऱ्यांची मागणी

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी/प्रदीप पाटील :** उरण तालुक्यातील कळंबुसरे चिरनेर हद्दीत उभारण्यात आलेल्या हिंद टर्मिनल कंपनीने घातलेल्या संरक्षण भिंतीमुळे कळंबुसरे व चिरनेर शेतकऱ्यांचे शेतावर जाण्याचेसर्व पारंपारिक मार्ग बंद झाले आहेत. त्याच प्रमाणे कंपनीने संपादित केलेल्या जमिनीवर टाकलेल्या भरावामुळे शेतीतील पाण्याचा निचरा होण्याचे पारंपारिक नैसर्गिक मार्ग बंद झाल्यामुळे भात लागवडीखालील शेतजमिनीतील पाण्याचा निचरा योग्य पद्धतीने होत नाही. त्यामुळे येथील शेतकऱ्यांचे भात पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याचे येथील शेतकऱ्यांनी सांगितले. त्यामुळे कंपनीने उभारलेली संरक्षण भिंत तातडीने पाडून, शेतकऱ्यांचे जुन्या पारंपारिक वहिवाटीतील शेतावर येण्या-जाण्याचे मार्ग खुले करण्यात यावेत अशी मागणी कळंबुसरे येथील अक्षय लक्ष्मण केणी व इतर स्थानिक शेतकऱ्यांनी 20 मे. 2025 रोजी उरणच्या तहसीलदारांना दिलेल्या निवेदनातून केली होती.

या निवेदनाची दखल घेत मे. तहसीलदार यांनी जुन्या वहिवाटीचे मार्ग पूर्ववत सुरू करण्यात यावे, असे कंपनीला आदेश देऊन देखील कंपनीने शेतकऱ्यांना शेतावर जाण्यासाठी अडथळा ठरणारी संरक्षण भिंत काढून न टाकल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीच्या मशागतीच्या कामात मोठी अडचण निर्माण झाली आहे. त्यामुळे येथील शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे. उरण तालुका कृषीप्रधान तालुका असून येथील शेतकरी अजून भात पिकांच्या शेतीची लागवड करीत आहेत. भाताचे पीक हे येथील शेतकऱ्यांचे महत्वाचे पीक असून, येथील शेतकऱ्यांच्या उपजीविकेचे महत्त्वाचे साधन आहे. त्यामुळे शेतीच्या हिवाळी, उन्हाळी व पावसाळी कामांच्या मशागती साठी ट्रॅक्टर, पावरटिलर या यंत्रसामुग्रीसह शेतीची इतर अवजारे शेतावर नेण्यासाठी मोठी अडचण निर्माण होत आहे.



शासन निर्णय क्रमांक जमीन 2015 प्र. क्र. 47 ज-1अ नुसार यंत्रसामुग्री शेतावर जाईल एवढा रस्ता ठेवणे बंधनकारक आहे. त्यामुळे कंपनीने बांधलेली संरक्षण भिंत काढून शेतकऱ्यांचे जुन्या पारंपारिक वहिवाटीचे मार्ग खुले करण्यात यावेत असे आदेश तहसीलदार यांनी या अगोदरही दिले होते असे अक्षय केणी यांनी निवेदनात म्हटले आहे. उभारण्यात आलेली संरक्षण भिंत कंपनीने तातडीने पाडून शेतकऱ्यांना शेतावर जाण्याचे मार्ग मोकळे करावेत अशी मागणी शेतकरी अक्षय केणी यांच्यासह इतर स्थानिक शेतकऱ्यांनीही केली आहे.

चिरनेर हद्दीत उभारण्यात आलेल्या हिंदू टर्मिनल कंपनीसाठी कळंबूसरे व चिरनेर येथील 37 शेतकऱ्यांच्या पिकत्या जमिनी संपादित करण्यात आल्या आहेत. या संपादित जमिनीत माझी सर्वे नंबर 154/3 ही शेतजमीन असल्याचे अक्षय केणी यांनी सांगितले. मात्र या कंपनीच्या परिसरात अजून काही शेतकऱ्यांच्या भात लागवडीखालील पिकत्या जमिनी शिल्लक आहेत. या शेत जमीनीत दरवर्षी भाताची लागवड केली जाते. मात्र मशागतीची कामे करण्यासाठी शेतावर जाण्यासाठी व मशागतीसाठी लागणारी अवजारे घेऊन जाण्यासाठी रस्ताच उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना मशागतीची कामे करण्यासाठी मोठ्या अडचणी येत आहेत. कंपनीला वेळोवेळी सूचना देऊन देखील कंपनी यागोष्टीकडे जाणीवपूर्वक कानाडोळा करत असल्याचे येथील शेतकऱ्यांनी सांगितले. याबाबत उरण तहसील कार्यालयात देखील लेखी निवेदन दिले आहे. कळंबुसरे व चिरनेर च्या शेतकऱ्यांची मागणी लवकरात लवकर मान्य करावी आन्यथा सदर कंपनी विरोधात मोठे जन आंदोलन उभारण्या येईल असा इशारा येथील स्थानिक शेतकऱ्यांनी दिला आहे.

---

# स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा वापर वाढवूया - पाणी पिण्याचा अधिकार गाजवूया!; नमस्ते नाशिक फाउंडेशनचा स्तुत्य उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**निफाड क्रीडा प्रतिनिधी विलास गायकवाड**

नाशिक दिनांक ३१ मार्च :- " पिण्याचे पाणी हे केवळ गरज नाही... तो प्रत्येकाचा जन्मसिद्ध हक्क आहे" स्वच्छ पिण्याच्या पाण्यावर समान अधिकार गाजवूया, स्वच्छतेतून आरोग्य आणि आरोग्यातून आनंद निर्माण करूया.

या उपक्रमांतर्गत महावीर जयंतीच्या पवित्र औचित्याने नमस्ते नाशिक फाउंडेशन, नाशिक यांच्या वतीने "स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा वापर वाढवूया – पाणी पिण्याचा अधिकार गाजवूया" हा समाजोपयोगी उपक्रम मोठ्या उत्साहात राबविण्यात आला. दान करून पुण्य कमवा या उपक्रमाअंतर्गत या वस्तू भेट देण्यात आल्या. गरजू बांधवांना माठ (मटके), मिठाई आणि पिण्याचे ग्लास वाटप करण्यात आले. फक्त वस्तू नव्हे, तर थंडावा, आदर आणि माणुसकी देण्याचा



हा प्रयत्न होता. भगवान महावीरांच्या विचारांतून प्रेरणा घेत "जगातील प्रत्येक जीवात स्वतःला पाहा, हीच खरी मानवसेवा" या तत्वावर चालत, संस्थेच्या अध्यक्षा स्नेहल देव यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम साकार झाला.

सप्रे वाडी या गावामध्ये निराधार, गरजू आणि शेतमजूर कुटुंबांना माठ, मिठाई आणि ग्लास भेट देण्यात आले. तसेच नॅशनल असोसिएशन फॉर ब्लाइंड (NAB), महाराष्ट्र संकुल येथे अंध बांधवांनाही पिण्याच्या पाण्याचे माठ, मिठाई आणि ग्लासांचे वाटप करून "सेवा हीच खरी संवेदना" याची प्रचिती देण्यात आली. या थंड पाण्याच्या घोटात फक्त तृप्ती नव्हती, तर आधार, आपुलकी आणि माणुसकीचा स्पर्श होता, आणि तोच आनंद प्रत्येक लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर झळकत होता. या उपक्रमासाठी महावीर इंटरनॅशनलचे अनिल नहार यांचे मोलाचे सहकार्य लाभले. यावेळी नमस्ते नाशिक फाउंडेशनच्या अध्यक्ष स्नेहल देव, सामाजिक कार्यकर्ते सुनील यलमामे, संगिता बाफना, भंडारी, अनुसया भानसी, दत्तात्रेय गुळवे,अशोक साळुंके, दिगंबर येलमामे, बाळाभाऊ चांदगीर, कृष्णा तेलंग, तुकाराम येलमामे, ॲड. रोहिदास तारगे, किशोर बाफना उपस्थित होते "दानातून फक्त वस्तू देऊ नका, भावना द्या, माणुसकी जपा!" "एक माठ हा अनेकांच्या आयुष्यातील थंडावा" अश्या भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

---

# नाशिक–छत्रपती संभाजीनगर महामार्गावर भीषण अपघात

## मद्यधुंद कंटेनर चालकाचा कहर, तिघे जखमी – एकाची प्रकृती गंभीर

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे/निफाड तालुका प्रतिनिधी :-** नाशिक–छत्रपती संभाजीनगर महामार्गावर अपघातांची मालिका सुरूच असून आज पुन्हा एक भीषण अपघात घडला. मद्यधुंद अवस्थेतील कंटेनर चालकाने नियंत्रण गमावून दोन वाहनांना जोरदार धडक दिल्याने तिघेजण जखमी झाले असून, त्यापैकी एकाची प्रकृती चिंताजनक आहे.

ही घटना आज दुपारी सुमारे २ वाजून ३ मिनिटांच्या सुमारास हॉटेल वेदांत जवळ, येथे घडली. विंचूरकडून नाशिकच्या दिशेने जाणारी स्कार्पिओ (MH 15 EF 2791) व मोटारसायकल (MH 15 KJ 0938) मार्गावरून जात असताना, समोरून भरधाव येणाऱ्या कंटेनरने अचानक नियंत्रण गमावून दोन्ही वाहनांना जोरदार धडक दिली.

या अपघातात दुचाकीवरील पाटोदा येथील वैभव पगारे व रोहित वाघ हे दोघे



जखमी झाले. अपघाताचा जोर इतका होता की दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी तात्काळ मदतकार्य करत जखमींना विंचूर येथील रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर वैभव पगारे व रोहित वाघ यांना पुढील उपचारासाठी नाशिक येथे हलविण्यात आले आहे. जखमींपैकी एका व्यक्तीची प्रकृती गंभीर असल्याची माहिती मिळत आहे.

अपघातामुळे काही काळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. संबंधित कंटेनर चालक मद्यधुंद अवस्थेत असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत असून, पोलिसांनी घटनास्थळी दाखल होऊन पुढील तपास सुरू केला आहे.महामार्गावरील सुरू असलेली कामे, बेजबाबदार वाहनचालक व वाहतूक नियमांचे उल्लंघन यामुळे अपघातांची संख्या वाढत असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. प्रशासनाने तातडीने कठोर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात येत आहे.

---

# माझ्यावरील कारवाई अन्यायकारक आणि तथ्यहीन, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे यांनी तोडले मौन, पक्षश्रेष्ठींना दिले उत्तर

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल :** भारतीय जनता पक्षाने केलेल्या सहा वर्षांच्या निलंबनाच्या कारवाईवर माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे यांनी अखेर आपली भूमिका स्पष्ट केली असून पक्षाने केलेले सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. आपल्यावर करण्यात आलेली ही कारवाई पूर्णपणे निराधार आणि वस्तुस्थितीला धरून नसून, केवळ त्रयस्थ व्यक्तींच्या ऐकीव माहितीवरून आणि राजकीय आकसापोटी करण्यात आली असल्याचा खळबळजनक दावा म्हात्रे यांनी केला आहे. या कारवाईच्या निषेधार्थ प्रभाग १४ आणि नेरे विभागातील समर्थकांनी सामूहिक राजीनामे देण्यास सुरुवात केल्याने आगामी काळात पनवेल भाजपच्या बालेकिल्ल्याला मोठे खिंडार पडणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. मनोहर म्हात्रे यांनी आपल्या स्पष्टीकरणात निवडणुकीच्या काळातील त्यांच्या अनुपस्थितीचे संवेदनशील कौटुंबिक कारण दिले आहे. ३ जानेवारी २०२६ रोजी त्यांच्या मोठ्या बहिणीचे निधन झाले होते. १३ जानेवारीपर्यंत दशक्रिया विधी आणि उत्तरकार्यासाठी त्यांना नाशिक येथे उपस्थित राहावे लागले होते, ही कौटुंबिक अडचण असतानाही पक्षाने केवळ प्रचारात सक्रिय नव्हते असा ठपका ठेवणे पूर्णपणे अन्यायकारक असल्याचे म्हात्रे यांनी म्हटले आहे. सलग तीन वेळा निवडून येऊनही उमेदवारी नाकारली असताना आपण पक्षनिष्ठा जपली आणि १५ जानेवारी रोजी प्रत्यक्ष आमदारांची भेट घेऊन त्यांच्या सूचनांचे पालन केले होते, असेही त्यांनी नमूद केले. प्रभाग १४ मधील पराभवाची खरी कारणे स्पष्ट करताना म्हात्रे यांनी थेट निवडणुकीतील संशयास्पद घडामोडींवर बोट ठेवले. भाजपच्या सारीका भगत आणि शेकापच्या मनिषा म्हात्रे या एकमेकींविरुद्ध ठरवून उभ्या राहिल्या नव्हत्या, याची माहिती आपण अर्ज भरतेवेळीच उमेदवार इक्बाल काजी यांना दिली होती, असा गौप्यस्फोट म्हात्रे यांनी केला आहे. याशिवाय खांदा गावकीच्या विरोधात असलेल्या व्यक्तींना सोबत घेऊन फिरणे आणि ज्यांनी लोकसभा व विधानसभा निवडणुकीत भाजपविरोधात काम केले त्यांनाच पालिका निवडणुकीत समोर ठेवणे, यामुळे निष्ठावान मतदार नाराज झाला आणि त्याचा फटका निवडणुकीला बसला. म्हात्रे यांनी निदर्शनास आणून दिले की, प्रभाग १४ मध्ये २०२४ च्या निवडणुकीतही महायुतीला कमी मतदान झाले होते, मग आताच आपल्याला लक्ष्य का केले जात आहे? विशेष म्हणजे, मनोहर म्हात्रे यांनी आपल्या कार्यकाळात प्रभागात जी करोडो रुपयांची विकासकामे केली होती, तीच कामे उमेदवाराच्या प्रचारपत्रकावर ठळकपणे वापरण्यात आली; मात्र जाणीवपूर्वक म्हात्रे यांचा फोटो त्यावरून गायब करण्यात आला. माझे काम वापरायचे आणि मलाच डावलायचे, ही पक्षाची रणनीती कार्यकर्त्यांना रुचलेली नाही. पक्षात राहून ज्यांनी प्रत्यक्ष गद्दारी केली त्यांच्यावर कोणतीही कारवाई न करता, केवळ जुन्या आणि निष्ठावान कार्यकर्त्यांना लक्ष्य केले जात असल्याने कार्यकर्त्यांमध्ये संतापाची लाट आहे.

---

# भगवान महावीर जयंतीनिमित्त पाटोद्यात भव्य रक्तदान शिबीर

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी):** भगवान महावीर जयंतीच्या निमित्ताने पाटोदा शहरात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या सामाजिक उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून मोठ्या संख्येने युवक-युवतींनी रक्तदान करून समाजसेवेचा आदर्श घालून दिला. शिबिराचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी उपस्थितांनी भगवान महावीर यांच्या अहिंसा, करुणा व सेवाभावाच्या शिकवणीचा जागर केला. "जीव दया हीच खरी सेवा" या संदेशाला अनुसरून रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. रक्तदान शिबिरात सामाजिक कार्यकर्ते व आरोग्य विभागाच्या सहकार्याने उत्कृष्ट व्यवस्था करण्यात आली होती. या वेळी रक्तदान करणाऱ्या युवकांनी ही उत्साहाने सहभाग



घेतला. रक्तदानानंतर रक्तदात्यांना प्रमाणपत्र व अल्पोपहार देऊन गौरविण्यात आले. या उपक्रमामुळे गरजू रुग्णांना जीवनदान मिळण्यास मदत होणार असून पाटोदा शहरात सामाजिक बांधिलकीची जाणीव अधिक दृढ झाल्याचे दिसून आले. आयोजकांनी भविष्यातही असे सामाजिक उपक्रम राबविण्याचा निर्धार व्यक्त केला.

---



# जिद्दीला कष्टाची जोड! मोहदा गावच्या लेकीची अमरावती ग्रामीण पोलीस दलात भरारी

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी -जितेंद्र खोडे :** "इच्छा तिथे मार्ग" या उक्तीचा प्रत्यय कळंब तालुक्यातील मोहदा येथील एका सामान्य शेतकरी कुटुंबातील लेकीने दिला आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत भावना किसनाजी ढोंगे हिची अमरावती ग्रामीण पोलीस विभागात 'पोलीस कॉन्स्टेबल' म्हणून निवड झाली आहे.तिच्या या यशाने केवळ ढोंगे आणि देवरे कुटुंबाचीच नव्हे,तर संपूर्ण गावातील मान उंचावली आहे.शेतकरी आई-वडिलांचे प्रोत्साहन आणि लग्नानंतरही कायम राहिलेली जिद्द भावनाचे वडील किसनाजी ढोंगे हे अल्पभूधारक शेतकरी आहेत. शेतीतील तुटपुंज्या उत्पन्नावर घर चालवताना त्यांनी आपल्या मुलीच्या शिक्षणात कधीही खंड पडू दिला नाही.ग्रामीण भागात आजही मुलींचे शिक्षण आणि करिअरबाबत अनेक मर्यादा असल्या तरी,तिच्या आई-वडिलांनी तिला नेहमीच प्रोत्साहन दिले.भावनाचे लग्न झाल्यानंतरही तिने आपले 'पोलीस' होण्याचे स्वप्न डोळ्यासमोरून ओझरते होऊ दिले नाही.उलट, सासरी गेल्यानंतर तिची ही जिद्द अधिक प्रबळ झाली.पतीची खंबीर साथ: स्वप्नपूर्तीचा मार्ग झाला सुकर

भावना यांच्या या यशात त्यांचे पती उमेश देवरे यांचा मोलाचा वाटा आहे. उमेश हे स्वतः महाराष्ट्र सुरक्षा बलात (MSF) कार्यरत आहेत.वर्दीचे महत्त्व आणि त्यासाठी लागणारे कष्ट त्यांना ठाऊक होते.लग्नानंतर पती जनरली संसारात रमून जाण्याचे सल्ले देतात, पण उमेश यांनी भावनाच्या पंखांना बळ दिले.त्यांनी भावनाकडून मैदानी चाचणीची तयारी करून घेतली, तिला चांगल्या मार्गदर्शनासाठी क्लासेस लावून दिले आणि प्रत्येक पावलावर ते तिच्या मागे खंबीरपणे उभे राहिले.पतीच्या या पाठिंब्यामुळेच भावना आज खाकी वर्दी मिळवण्यात यशस्वी झाली आहे. गावात जल्लोषात सत्कार सोहळा भावना ढोंगे-देवरे हिची पोलीस दलात निवड झाल्याचे वृत्त मोहदा गावात पोहोचताच सर्वत्र आनंदाचे वातावरण पसरले.तिच्या या यशाचे कौतुक करण्यासाठी गावकरी आणि कुटुंबाच्या वतीने विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.या सोहळ्याला गावाचे सरपंच अक्षय मेश्राम आणि पोलीस पाटील पियुष गबराणी यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी बोलताना पोलीस पाटील पियुष गबराणी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले,"भावनाचे यश हे केवळ तिचे वैयक्तिक यश नसून,ते गावातील प्रत्येक मुलीसाठी प्रेरणादायी आहे.एका शेतकरी कन्येने लग्नानंतरही जिद्द टिकवून ठेवून मिळवलेले हे यश कौतुकास्पद आहे.ग्रामीण भागातील मुलींनी भावनाचा आदर्श घेऊन स्वतःचे भविष्य घडवावे."भावनाचे कृतज्ञतापूर्ण मनोगत आपल्या सत्कारानंतर भावनाने अत्यंत भावूक होत सर्वांचे आभार मानले."माझ्या या यशामागे माझ्या आई-वडिलांचे संस्कार आणि माझ्या पतीचा अढळ विश्वास आहे. त्यांनी दिलेल्या पाठिंब्यामुळेच मी आज इथवर पोहोचू शकले.पोलीस दलात सेवा करताना मी पूर्ण निष्ठेने माझे कर्तव्य पार पाडेन," असे तिने यावेळी सांगितले.भावना ढोंगे हिच्या या यशाबद्दल जिल्हाभरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. कष्ट, चिकाटी आणि कुटुंबाची साथ असेल तर कोणतीही गोष्ट अशक्य नाही, हेच या घटनेतून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

## दोन घरांमध्ये घरफोडी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** दोन बंद घरांमध्ये घरफोडी करत चोरांनी चांदीच्या, पितळेच्या वस्तू आणि रोख रक्कम चोरून नेली. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात 28 मार्च रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.अर्जुन मोहिते (राहणार सेक्टर 15 ए, नवीन पनवेल) यांच्या रूमच्या दरवाजाचे लॉक तोडून चोराने चांदीच्या समई, घंटी, पैंजण, जोडवी, कंगन, सोन्याचे बदाम, रोख रक्कम आणि देवाच्या पितळेच्या मूर्ती चोरून नेल्या तर त्यांच्याच सोसायटीमधील पहिल्या माळ्यावरील रूम नंबर तीन मधील अक्षया व्यंकटेश्वरा यांच्या घरातून देखील चांदीचे दिवे, समई, वाट्या, ग्लास आणि रोख रक्कम व देवीच्या मूर्ती चोरून नेल्या.

## वीज चोरी प्रकरणी गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** वीज मीटर मध्ये छेडछाड करून तीन लाख दोन हजारांची विज चोरी करून महावितरणचे नुकसान केल्याप्रकरणी रतन घरत आणि मनोहर शेळके यांच्या विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात 27 मार्च रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.11 फेब्रुवारी रोजी महावितरणच्या अधिकाऱ्यांनी कोनगाव येथे वीज मीटर तपासणीसाठी गेले. यावेळी रतन घरत आणि मनोहर शेळके यांच्या वीज मीटरची पाहणी केली. त्यावेळी मीटर मंद गतीने चालत असल्याचे दिसून आले. वीज मीटर मध्ये फेरफार केल्याचे समोर आले. बारा महिन्यांपासून 8 हजार 298 युनिटची वीज चोरून वापरली. आणि महावितरण कंपनीचे नुकसान केले. या प्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला.

## पादचाऱ्याला इको टॅक्सीची धडक, पादचारी जखमी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** केवाळे बस स्टॉप जवळ काळया पिवळया रंगाच्या इको टॅक्सीने पादचाऱ्याला धडक दिली. या धडकेत मोहन मुरमुर हा जखमी झाला. या प्रकरणी चालकाविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात 28 मार्च रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.27 मार्च रोजी मोहन मुरमुर हा पायी चालत जात असताना हरीग्राम ते केवाळे गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील केवाळे बस स्टॉप जवळ काळया पिवळया रंगाच्या इको टॅक्सीने संध्याकाळी साडेसातच्या सुमारास त्याला ठोकर मारून अपघात केला. त्यात त्याच्या पाठीवर आणि डोक्याला गंभीर दुखापती झाल्या. त्याला सुकापुर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# प्राचार्य ज्ञानेश्वर काकडे यांचा 'सेवापूर्ती गौरव' सोहळा संपन्न

## सहकार महर्षी माणिकराव पालोदकर विद्यालयात ३० वर्षांच्या निष्ठेचा सन्मान

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड:-** राजर्षी शाहू शिक्षण संस्था, सिल्लोड संचलित सहकार महर्षी माणिकराव पालोदकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पालोदचे प्राचार्य ज्ञानेश्वर संपतराव काकडे यांचा मंगळवारी (ता. ३१) सेवानिवृत्तीनिमित्त 'सेवापूर्ती गौरव' सोहळा अत्यंत उत्साहात व भावूक वातावरणात संपन्न झाला. गेल्या तीन दशकांपासून त्यांनी बजावलेल्या निष्ठावंत शैक्षणिक व प्रशासकीय सेवेबद्दल मान्यवरांच्या हस्ते त्यांचा यथोचित गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मुख्याध्यापक तेजराव जंजाळ होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव प्रा. डॉ. राहुल पालोदकर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते प्राचार्य काकडे यांचा सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ आणि गौरवपत्र देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. राहुल पालोदकर म्हणाले, की "संस्थेच्या ध्येयधोरणांशी एकनिष्ठ राहून प्राचार्य काकडे यांनी दीर्घकाळ विद्यार्थी घडवण्याचे पवित्र कार्य केले. शिक्षक केवळ वेतनासाठी नव्हे, तर आत्मिक समाधानासाठी आणि आदर्श समाज घडवण्यासाठी कार्यरत असतो,




याचे उत्तम उदाहरण म्हणजे काकडे सर आहेत. त्यांच्या प्रदीर्घ कार्यकाळातील शिस्त आणि सचोटी नव्या पिढीसाठी सदैव प्रेरणादायी ठरेल."

सत्काराला उत्तर देताना प्राचार्य काकडे भावूक झाले. ते म्हणाले, की "कुटुंबीयांची खंबीर साथ आणि संस्थेचे पदाधिकारी, वरिष्ठ व सहकारी शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी दिलेल्या सहकार्यामुळेच मी ही जबाबदारी यशस्वीपणे पार पाडू शकलो. ही सेवापूर्ती म्हणजे माझ्यासाठी प्रेमाची मोठी शिदोरी आहे." अध्यक्षीय समारोप करताना तेजराव जंजाळ यांनी काकडे यांच्या संयमी आणि अभ्यासू वृत्तीचे कौतुक केले.

या सोहळ्यात आकाश पांढरे, योगेश निंभोरे, प्रदीप काकडे, रामेश्वर जाधव, मनोज देशमुख, विष्णू फरकडे, शिवाजी भोंबे, अजित केळे, साक्षी काकडे, संगीता काकडे, योगिता जाधव व गणेश सोनवणे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी मुख्याध्यापक सुरेश घोडके, किशोर जिगे, विष्णू फरकडे, प्रकाश काथार, राजू कावले, माणिक परदेशी, प्रा. डॉ. विजय पांडे, निशांत म्हस्के, गजानन डमाळे, विष्णू काकडे, दिलीप जाधव, रामेश्वर जाधव, गणेश सोनवणे, तेजराव सोनवणे, विजय सोनवणे, समाधान कण्हेर, भगवान वनारसे, सुरेश मोरे, सर्जेराव मोरे, प्रयाग मोरे आणि प्रयाग सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महादेवी ठवरे यांनी केले, परिचय योगिता जाधव यांनी करून दिला तर स्वागतगीत प्रतिक्षा गव्हाणे हिने सादर केले. सूत्रसंचालन प्रदीप कानडजे यांनी केले, तर आभार एकनाथ जंजाळ यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वृंद व काकडे परिवाराने परिश्रम घेतले.



**डॉ.पंजाबराव देशमुख रोपवाटिका येथे दिनांक ३०/०३/२०२६ रोजी अचानक आग लागून उंच आघीचे लोट निघू लागले , सुदैयवाने कोणतीही जीवित हानी झाली नही, परंतु हि रोपवाटिका अर्जुन नगर परिसराला लागून असल्या मुळे नागरिकान मध्ये भीतीच वातावरणअघिने काही मिनिटांमध्येच घेतला मोठा फैलाव नागरिकांच्या सुचक्तेने अग्निशमन दल घटनास्थळी लवकरच दाखल झाले त्यामुळे आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. आग का लागली कशी लागली किंवा लावली असावी असे प्रश्न सद्या नागरिकांना पडले आहेत.( दैनिक युवक आधार )**

# पुनर्वसित गावांतील शाळा उभारणीचा प्रश्न

## २७ गाव प्रकल्पग्रस्तांकडून जि.प. अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांना निवेदन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसित गावांमध्ये शाळा उभारणीचा प्रश्न गंभीर बनला असून, याबाबत २७ गाव प्रकल्पग्रस्त सामाजिक संस्थेच्या वतीने रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी संस्थेच्या वतीने अध्यक्ष नंदराज मुंगाजी, सचिव प्रेम पाटील, कार्याध्यक्ष रुपेश धुमाळ, रवींद्र पाटील, मनखुश नाईक, अनिल केणी, रोशन घरत, अमित मढवी व इतर सदस्य उपस्थित होतेचिंचपाडा, कोपर, कोल्ही, वाघिवली वाडा, वरचे ओवळे, उलवे, कोंबडभुजे, तरघर, गणेशपुरी आदी गावांतील शाळा संपादित होऊन दहा वर्षांचा कालावधी लोटला असतानाही पुनर्वसन क्षेत्रात नवीन शाळांची



उभारणी झालेली नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाला असून, संविधानाने दिलेल्या शिक्षणाच्या मूलभूत हक्कावर गदा येत असल्याचे संस्थेने निवेदनात नमूद केले आहे.

पुनर्वसित क्षेत्रातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता प्रत्येक गावात इयत्ता १ ते ८ पर्यंत शिक्षणाची सोय असलेली सुसज्ज शाळा उभारणे आवश्यक आहे. मात्र सिडकोकडून केवळ ४ वर्गखोल्यांचे नियोजन करण्यात आले असून ते अपुरे असल्याचा आरोप करण्यात आला आहे. प्रत्येक शाळेत किमान १८ खोल्या, स्वतंत्र मुख्याध्यापक कक्ष, ग्रंथालय, संगणक कक्ष, तसेच मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे व इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

तसेच चिंचपाडा (आर-२) व तरघर येथील सिडकोकडून उभारलेल्या शाळा संबंधित गावांना देण्यात याव्यात व भविष्यात इयत्ता ९ ते १२ पर्यंत शिक्षणाची सुविधा सुरू करण्यासाठी नियोजन करावे, अशी मागणी करण्यात आली. वरचे ओवळे पुनर्वसन क्षेत्रात शाळा नसल्याने विद्यार्थ्यांना दूर जावे लागत असून, त्यासाठी वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली आहे.यावेळी जि.प. अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी सदर प्रश्न गांभीर्याने घेऊन संबंधित यंत्रणेशी चर्चा करून योग्य तो तोडगा काढण्याचे आश्वासन दिल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले.दरम्यान, सिडकोने सुरू केलेली ४ वर्गखोल्यांच्या शाळांची निविदा प्रक्रिया तात्काळ स्थगित करून प्रत्येक पुनर्वसित गावासाठी १८ खोल्यांच्या शाळांचे नियोजन करण्यात यावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

## बातम्या प्रकाशित केल्यानंतर सुद्धा प्रशासनाचे मटका अड्ड्यांकडे दुर्लक्ष

### प्रशासनाने मटका अड्डेवाल्यांचा मुसक्या आवळायच्या तर मटका अड्डेवाले प्रशासनाचे मुसक्या आवळतांना दिसून येत आहे

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी -जितेंद्र खोडे :** वडकी जिल्हा पोलीस अधीक्षकांनी अवैध धंद्यांविरुद्ध कडक मोहीम उघडण्याचे आदेश दिले असतानाही, वडकी पोलीस स्टेशनच्या हद्दीत मात्र 'खुल्या मटक्याचा' बाजार जोरात सुरू असल्याचे चित्र आहे. वरिष्ठांच्या आदेशाला स्थानिक पोलिसांनी अक्षरशः 'केराची टोपली' दाखवल्याची चर्चा परिसरात रंगत असून, यामुळे गुन्हेगारांचे मनोबल उंचावले आहे.

**नेमका प्रकार काय?**

गेल्या काही दिवसांपासून वडकी व वाढोणा(बाजार) या गावांमध्ये मटका जुगाराचे अड्डे राजरोसपणे सुरू आहेत. गावातील मुख्य बाजारपेठ,पानटपऱ्या आणि आडमार्गावरील हॉटेल्समध्ये मटक्याचे आकडे लावण्यासाठी गर्दी होत आहे.विशेष म्हणजे,हे सर्व व्यवहार दिवसाढवळ्या सुरू असतानाही पोलीस प्रशासन याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे.शासनाने जुगारावर कडक बंदी घातलेली असतानाही, वडकीतील काही ठराविक अड्ड्यांवर छुप्या पद्धतीने आणि काही ठिकाणी तर उघडपणे मटका सुरू आहे. स्थानिकांनी वारंवार तक्रारी करूनही पोलिसांकडून केवळ 'दिखाऊ' कारवाई केली जाते, असा संताप व्यक्त होत आहे. "हप्तेखोरीमुळेच पोलीस या धंद्यांकडे कानाडोळा करत आहेत का?" असा सवाल आता सामान्य जनता विचारत आहे.तरुणाई आणि सर्वसामान्य नागरिक भरडले जातात या अवैध धंद्यांमुळे गावातील तरुण पिढी व्यसनाच्या आहारी जात असून अनेक कष्टकरी मजूर आपले कष्टाचे पैसे मटक्यात गमावत आहेत.यामुळे अनेक कुटुंबांमध्ये वाद होत असून सामाजिक शांतता धोक्यात आली आहे."पोलीस अधीक्षकांनी अवैध धंद्यांवर कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत, परंतु वडकी व वाढोणा (बाजार ) येथे मात्र परिस्थिती उलट आहे.स्थानिक पोलिसांच्या आशीर्वादामुळेच हे अड्डे सुरू आहेत का? असा प्रश्न सर्वसामान्यांना पडला आहे.

## पाटोदा तालुका बलुतेदार संस्था पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी):-** पाटोदा व शिरुर तालुका एकत्र असणारी पाटोदा तालुका औद्योगिक बहुउद्देशीय ग्रामीण सहकारी संस्थेची पंचवार्षिक संचालक मंडळाची निवडणूक बिनविरोध जाहीर करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील ग्रामीण कारागीर व बलुतेदारांना व्यावसायिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी शासनाने १९७२ साली प्रत्येक तालुका पातळीवर या गट संस्था म्हणजेच बलुतेदार सहकारी संस्था स्थापन केल्या होत्या. या संस्थेच्या निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर ११ जागांसाठी १२ उमेदवारी अर्ज दाखल झाल्यानंतर त्यापैकी दोन उमेदवारी अर्ज मागे घेण्यात आल्याने १० संचालक बिनविरोध निवडून आले तर एका राखीव जागेसाठी उमेदवारी अर्ज न आल्याने ती जागा रिक्त राहिली या मध्ये सर्वसाधारण मतदार संघातून -बाळासाहेब शिरोळे, बबन



पवार, नवनाथ भालेकर, दिनेश नारायणकर, शिवाजी डिडूळ, हरिभाऊ मस्के, इतर मागास प्रवर्गातून दिगांबर नाईकनवरे, नागरिकांच्या मागास प्रवर्गातून - महादेव उत्तम अडागळे तर महिला मतदारसंघातून - सौ.ज्योती विजय जोशी व सौ.रेखा दत्तात्रय नागथई यांची बिनविरोध निवड झाली आहे. पाटोदा व शिरुर तालुका कार्यक्षेत्र असणाऱ्या या संस्थेचे जवळपास साडेतीन हजार सभासद आहेत. या मध्ये सर्व पारंपरिक कारागीरसह नवीन छोटे उत्पादक व सेवा उद्योग करणारांना सभासद करण्यात आलेले आहे. तसेच जिल्हा उद्योग केंद्र, पंतप्रधान रोजगार योजना, खादी ग्रामोद्योग मंडळाच्या विविध योजनांच्या बाबतीत या संस्थेतून मार्गदर्शन करण्यात येते व विविध योजने मधुन उद्योजकांना लाभ मिळवून देण्यात येतो.

या बलुतेदार संस्थेवर माजी जिल्हा परिषद सदस्य कै.नारायणराव क्षिरसागर यांचे वर्चस्व होते. परंतु तीस वर्षांपूर्वी छगन मुळे यांनी ही संस्था ताब्यात घेवून आजपर्यंत उत्तम काम करीत अधिराज्य केले. परंतु संस्थेला निवडणूकीतून आर्थिक फटका नको आणि आता थांबले पाहिजे म्हणून त्यांनी दोन मतदार संघातून आपली उमेदवारी मागे घेवून निवडणूक बिनविरोध केली हे विशेष...

## पाटोद्यात विद्यार्थिनी व पालकांसाठी भव्य आरोग्य जनजागृती मेळावा; गर्भाशय कॅन्सर जनजागृतीनंतर HPV लसीकरणाला सुरुवात

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा(प्रतिनिधी):** पाटोदा शहरात दिनांक ३०/ ०३/ २०२६ रोजी पाटोदा शहरातील प्रियदर्शिनी माध्यमिक कन्या शाळा व वसंतराव माध्यमिक शाळा येथे विद्यार्थिनी व पालकांसाठी भव्य आरोग्य जनजागृती व समुपदेशन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात इयत्ता ८ वी ते इयत्ता ९ वी च्या वर्गातील मुलींसह त्यांच्या पालकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. हा कार्यक्रम डॉ.नरेशजी कासट THO पाटोदा यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थिनींना गर्भाशयाच्या कॅन्सरचे वाढते प्रमाण, त्याची कारणे, लक्षणे तसेच त्या वरील प्रतिबंधात्मक उपाय या बाबत सखोल माहिती देण्यात आली. विशेषतः वय वर्षे १४ ते १५ वयोगटातील मुलींसाठी HPV लसीकरण अत्यंत आवश्यक असल्याचे अधोरेखित केले. समुपदेशक चव्हाण यांनी विद्यार्थिनींशी



संवाद साधत त्यांच्या शंकांचे निरसन केले व आरोग्याबाबत सजग राहण्याचे आवाहन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थिनींमध्ये सकारात्मक प्रतिसाद दिसून आला. या कार्यक्रमात TNO दराडे मॅडम यांची उपस्थिती विशेष ठरली. दराडे मॅडम यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना लसीकरणाचे महत्त्व सोप्या व प्रभावी भाषेत समजावून सांगितले. तसेच पालकांनाही आपल्या मुलींच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देण्याचे आवाहन त्यांनी केले. या वेळी उपस्थित आशा वर्कर यांनी ही शासकीय आरोग्य योजनांची माहिती देत लसीकरणासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमानंतर तत्काळ विद्यार्थिनींसाठी HPV लसीकरण मोहीम राबविण्यात आली. पात्र मुलींना प्रत्यक्ष लस देण्यात आली असून या उपक्रमामुळे जनजागृतीसोबतच प्रत्यक्ष कृती ही झाल्याने कार्यक्रमाला अधिक परिणामकारक स्वरूप प्राप्त झाले. कार्यक्रमाच्या शेवटी पालक मेळाव्यात पालकांशी संवाद साधण्यात आला. पालकांनी या उपक्रमाचे स्वागत करत अशा आरोग्य विषयक उपक्रमांची गरज व्यक्त केली. या उपक्रमामुळे पाटोदा शहरात आरोग्याबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून विद्यार्थिनी व पालकांमध्ये HPV लसीकरणाबाबत जागरूकता मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

## शनिमांडळ परिसरावर निसर्गाची वक्रदृष्टी, गारपिटीने पिकांचे नुकसान

**नंदुरबार :** नंदुरबार तालुक्याच्या पूर्वभागातील शनिमांडळ गावासह परिसराला सोमवारी सायंकाळी वादळी पावसासह गारपीटीने चांगलेच झोडपले. अर्धातास झालेल्या गारपीटीने परिसरातील कांदा, मका आणि भुईमुगाच्या पिकाला चांगलाच तडाखा बसला असून शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे.

नंदुरबार तालुक्याच्या पूर्व भागातील गावांमध्ये वादळी वाऱ्यासह गारपीट झाली. परिसरातील शनिमांडळ, तिलाली, तलवाडे, इंदरहट्टी या भागात जवळपास अर्धातास मोठ्या आकाराची गारपीट झाल्याचे पहायला मिळाले. अचानक झालेल्या या गारपीटीच्या पावसाने शेतकरी, व्यावसायिकांची चांगलीच तारांबळ उडाली.



गारपीटीने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले.

गारपीटीमुळे या परिसरात लागवड करण्यात आलेला कांदा. मका, भुईमुग सारख्या पिकाला चांगलाच तडाखा बसला. अवघ्या पंधरा दिवसावर काढणीला आलेल्या कांद्याला गारपीटीचा फटका बसल्याने एकरामागे लाख रुपयांचा खर्च करुनही अवकाळीत सापडलेल्या कांद्याला आता कवडीमोल भाव मिळण्याचा धोका आहे.

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर जावून पीक नुकसानीची मंगळवारी माजी खासदार डॉ. हिना गावित यांनी पाहणी केली. त्यांच्या समवेत महसूल आणि कृषी विभागाचे अधिकारी होते. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या सरसकट नुकसानीच्या पंचनाम्याच्या सूचना यंत्रणेला दिल्या. या परिसरात कांदा पिकाची मोठी लागवड होत असल्याने सर्वाधिक फटका हा कांदा पिकाला बसला आहे.

शासन स्तरावर लवकरात लवकर पंचनामे पूर्ण करुन शेतकऱ्यांना भरघोस मदत देवून त्यांना आधार देण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा केला जाणार असल्याचे यावेळी हिना गावित म्हणाल्या. हिना गावित यांचे वडील डॉ. विजयकुमार गावित या परिसराचे आमदार असून त्यांच्यावर मोठी शस्त्रक्रीया झाली असल्याने दोन ते तीन महिन्यापासून ते मुंबईत आहेत. त्यामुळे त्यांच्यावतीने हिना गावितांनी पीक नुकसानीची पाहणी केली.